रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३०३
www.ramprahar.com

बुधवार, २१ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

समस्या निराकरणासाठी उच्चस्तरीय बैठक/३
सकारात्मक दृष्टिकोन हेच जीवनाचे सौंदर्य/४
'क्रीडा पत्रकारांच्या बातमीदारीचे कौतुक केले पाहिजे'/८

## रायगडासह राज्यातील अवकाळी पाऊस थांबेना!

**अलिबाग :** रायगडसह राज्यातील अनेक जिल्ह्यांना अवकाळी पावसाने जोरदार तडाखा दिला. अनेक



जिल्ह्यात सोसाट्याच्या वाऱ्याने अनेक झाडे उन्मळून पडली. अवकाळीने अनेक भागांना झोडपून काढले. मुंबई, पुणे, कोल्हापूर, जळगाव, सांगली, रायगड, नाशिक अशा अनेक शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात मंगळवारी सायंकाळी मुसळधार पाऊस पडला आहे. दुपारनंतर ढगाळ वातावरण झाले असून सायंकाळी ६ च्या सुमारास पावसाने सुरुवात केली. मुसळधार पाऊस पडल्याने रोहयातील जनजीवन विस्कळित झाले आहे. रायगड जिल्ह्यातील पनवेल, रोहा, रसायनी, माणगाव, श्रीवर्धन, पेण इत्यादी तालुक्यांमध्ये मंगळवारी अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली होती. दरम्यान, अनेक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले आहे.

# कर्जतमधील शिलार आणि पोशीर जल प्रकल्पाच्या खर्चाला मंत्रिमंडळाची मंजुरी

**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील शिलार (४८६९.७२ कोटी रुपये) आणि पोशीर (६३९४.१३ कोटी रुपये) प्रकल्पाच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता मंगळवारी (दि.२०) झालेल्या राज्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. माझे घर माझे अधिकार हे ब्रीद वाक्य घेऊन राज्यात नवीन गृहनिर्माण धोरण प्रस्तावालाही राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यात नगरविकास विभागासह, जलसंपदा विभागातील निर्णयांचा समावेश आहे.

## राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरणही जाहीर



राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर झाले आहे. यामध्ये 'माझे घर-माझे अधिकार' हे ब्रीद. ७० हजार कोटींची गुंतवणूक येणार, झोपडपट्टी पुनर्वसन ते पुनर्विकास असा सर्वांगीण कार्यक्रम होणार आहे. अल्प उत्पन्नधारक, ज्येष्ठ नागरिक, महिला, औद्योगिक कामगार आणि विद्यार्थी यांच्यासाठी विशिष्ट गरजांचा धोरणात प्राधान्याने विचार यामध्ये होणार आहे.

नगरविकास विभागांतर्गत बायोमिथेनेशन तंत्रज्ञानाचा वापर करुन कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी मे. महानगर गॅस लिमिटेड यांना बृहन्मुंबई महापालिकेच्या अखत्यारीतील देवनार येथील भूखंड सवलतीच्या दरात भाडेपट्ट्याने उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

उद्योग विभागाच्या अंतर्गत धोरण कालावधी संपुष्टात आलेल्या धोरणांतर्गत विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. विधि व न्याय विभागांतर्गत कारंजा, जिल्हा वाशिम येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन करण्याचा निर्णय. यासाठी एकूण २८ पदनिर्मितीला तसेच १.७६ कोटींच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे.

जलसंपदा विभागांतर्गत सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजना, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे या प्रकल्पाच्या ५३२९.४६ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता. ५२,७२० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

अरुणा मध्यम प्रकल्पांतर्गत हेत, तालुका वैभववाडी जिल्हा सिंधुदुर्ग या प्रकल्पासाठी २०२५.६४ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता. ५३१० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. पोशिर प्रकल्प, तालुका कर्जत जिल्हा रायगड या प्रकल्पाला ६३९४.१३ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तर शिलार तालुका कर्जत जिल्हा रायगड या प्रकल्पाला ४८६९.७२ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

### असा आहे शिलार प्रकल्प

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील शिलार प्रकल्पांतर्गत किकवी येथे सिल्लार नदीवर ६.६१ टी.एम.सी. क्षमतेचे धरण बांधणे प्रस्तावित आहे. या योजनेस ४८६९.७२ कोटी रूपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पाचे पाणी मुंबई महानगर, पनवेल महानगरपालिका आणि नवी मुंबई महानगरपालिका आदी शहरांना पिण्याच्या पाण्याकरिता पुरविले जाणार आहे. त्यामुळे पाणी वापर आधारित लाभधारक संस्थांची भांडवली खर्चातील हिस्सेदारी निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (भांडवली खर्चातील हिस्सेदारी टक्केवारी १५.०८, रक्कम ७३४.३५ रूपये कोटीत), पनवेल महानगरपालिका (भांडवली खर्चातील हिस्सेदारी टक्केवारी ७५.४२, रक्कम ३६७२.७५ रूपये कोटीत), नवी मुंबई महानगरपालिका (भांडवली खर्चातील हिस्सेदारी टक्केवारी ९.५, रक्कम ४६२.६२ रूपये कोटीत) या संस्थांना खर्चातील हिस्सेदारी निश्चित करून देण्यात आली आहे. हा प्रकल्प कोकण पाटबंधारे विकास महामंडळद्वारे ठेव तत्त्वावर उभारण्यात येणार आहे. प्रकल्प राबविण्याकरिता कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नवी मुंबई व पनवेल महानगरपालिका यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे.

### असा आहे पोशीर प्रकल्प

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील कुरूंग गावाजवळ पोशीर नदीवर १२.३४४ टी.एम.सी.चे धरण बांधणे प्रस्तावित आहे. प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठा ९.७२१ टी.एम.सी.आहे. त्यापैकी पिण्यासाठी ७.९३३ टी.एम.सी. आणि औद्योगिक वापरासाठी १.८५९ टी.एम.सी. पाणी वापर प्रस्तावित आहे. या प्रकल्पाचे पाणी मुंबई महानगर, नवी मुंबई, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर आदी शहरांना पिण्याच्या पाण्याकरिता पुरविले जाणार आहे. त्यामुळे पाणी वापर आधारित लाभधारक संस्थांची भांडवली खर्चातील हिस्सेदारी निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (३३.९६ टक्के, २१७१.४५ कोटी), नवी मुंबई महानगरपालिका (४३.५३ टक्के, २७८३.३७ कोटी), उल्हासनगर महानगरपालिका (९.५६ टक्के, ६११.२८ कोटी), अंबरनाथ नगर परिषद (७.०७ टक्के, ४५२.०६ कोटी), बदलापूर नगर परिषद (५.८८ टक्के, ३७५.९७ कोटी) या संस्थांना खर्चातील हिस्सेदारी निश्चित करून देण्यात आली आहे.

हा प्रकल्प कोकण पाटबंधारे विकास महामंडळद्वारे ठेव तत्त्वावर उभारण्यात येणार आहे. हा प्रकल्प राबविण्याकरिता कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण, नवी मुंबई महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, अंबरनाथ नगर परिषद, बदलापूर नगर परिषद यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे.

# कल्याणमध्ये इमारतीचा स्लॅब कोसळून सहा जणांचा मृत्यू



**कल्याण : प्रतिनिधी**

राज्यात मान्सूनपूर्व पावसाने धुमाकूळ घातला आहे. मान्सून पूर्व पावसामुळे कल्याणमध्ये भयानक दुर्घटना घडली आहे. कल्याणमध्ये एका धोकादायक इमारतीचा स्लॅब कोसळून सहा जणांचा मृत्यू झाला आहे.

कल्याण पूर्व परिसरात ही दुर्घटना घडली आहे. कल्याण पूर्व परिसरात असलेल्या महाराष्ट्र नगर मधील चिकणी पाडा येथे सप्तशृंगी इमारतीचा स्लॅब कोसळला आहे. तळ अधिक चार मजल्याची ही इमारत सुमारे ४० वर्षे जुनी आहे. या इमारतीमध्ये एकूण २५ कुटुंब राहत होते. २० मे रोजी दुपारच्या सुमारास या इमारतीच्या एका बाजूचा दुसऱ्या मजल्यावरील स्लॅब कोसळला.

दुर्घटनेची माहिती मिळताात अग्निशमन विभाग आणि केडीएमसी चा पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलीस प्रशासन स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मदतीने घटनास्थळी तातडीने बचाव कार्य सुरू करण्यात आले. जखमींना तातडीने खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.


प्रमिला साहू (५८), नामस्वी शेलार (दीड वर्षाचे बाळ), सुनीता साहू (३७), सुजाता पाडी (३२), सुशीला गुजर (७८) आणि व्यंकट चव्हाण (४२) अशी मृतांची नावे आहेत. अरुणा गिरणारायन (४८), शरवील शेलार (०४), विनायक पाधी (साडे चार वर्ष), यश क्षीरसागर (१३), निखिल खरात (२७), श्रद्धा साहू (१४) अशी जखमींची नावे आहेत.

## नक्षलवाद्यांना अटक

**गडचिरोली :** हिंसक कारवायांमध्ये सक्रिय सहभाग असलेल्या पाच नक्षलवाद्यांपैकी तिघांना अटक, तर दोघांना गडचिरोली पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. भामरागड तालुक्यातील अबूझमाडच्या बिनागुंडा परिसरात ही कारवाई करण्यात आली. त्यांच्यावर शासनाचे तब्बल ३६ लाख रुपयाचे बक्षीस होते. एक स्वयंचलित एसएलआर रायफल, दोन भरमार बंदूक आणि चार रायफल असे सात हत्यार जप्त करण्यात आले आहे.

उंगी होयाम, पल्लवी केसा मिडीयम, देवे कोसा पोडीयाम असे अटक केलेल्या नक्षलवाद्यांची नावे असून इतर दोघे वयाचा ठोस पुरावा नसल्याने ते ताब्यात आहेत.

## प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांचे निधन



**पुणे :** आंतरविद्यापीठीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र केंद्राचे संस्थापक संचालक आणि जागतिक कीर्तीचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांचे पुण्यात मंगळवारी (दि.२०) निधन झाले. त्यांनी वयाच्या ८७ वर्षी अखेरचा श्वास घेतला. अल्पशा आजारामुळे त्यांचे निधन झाले आहे.

१९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे जन्मलेले जयंत नारळीकर यांनी आपले पदवी शिक्षण काशी हिंदू विद्यापीठातून पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी केंब्रिज विद्यापीठात उच्च शिक्षण घेतले. तिथे त्यांनी मॅथेमॅटिकल ट्रायपॉस परीक्षेत 'रँगलर' आणि 'टायसन मेडलिस्ट' ही प्रतिष्ठेची पदके विशेष कामगिरीसाठी म्हणून मिळवली. वैज्ञानिक संशोधनाबरोबरच त्यांनी विज्ञान जनजागृतीसाठी मोठे योगदान दिले. त्यांनी या विषयावर अनेक पुस्तके आणि लेख लिहिले. विज्ञान काल्पनिक साहित्यलेखन क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय काम केले.

## निवडक

### आयपीएलचा अंतिम सामना अहमदाबादमध्ये रंगणार

**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ च्या अंतिम सामन्याबाबत एक मोठी अपडेट आली आहे. ताज्या वेळापत्रकानुसार, आयपीएलचा अंतिम सामना आता ३ जून रोजी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. मंगळवारी बीसीसीआयच्या बैठकीत यावर निर्णय घेण्यात आला. अहमदाबाद मैदानावरच १ जून रोजी क्वालिफायर २ चेही आयोजन करण्यात येईल अशी माहिती समोर आली आहे.

### राज्यात डाळींचा पुरेसा साठा उपलब्ध; प्रशासनाची माहिती

**मुंबई :** चना, तूर, मूग, उडीद आणि मसुर यांसारख्या आवश्यक वस्तूंचा राज्यात पुरेसा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास न ठेवता कोणीही डाळींचा अनावश्यक व जास्तीचा साठा करू नये, असे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने प्रसिद्ध पत्रकान्वये कळविले आहे. अफवांपासून सावध राहून जबाबदारीने वागण्याचे आणि गरजेपुरतीच खरेदी करण्याचे आवाहन प्रशासनाने सर्व नागरिकांना केले आहे.

# १ जून ते ३१ जुलै कालावधीत राज्यात मासेमारी करण्यास बंदी



**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ व सुधारणा अध्यादेश, २०२१ अन्वये यावर्षी १ जून ते ३१ जुलै २०२५ (दोन्ही दिवस धरुन ६१ दिवस) या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रीय जलधि क्षेत्रात यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना मासेमारी करण्यास बंदी घालण्यात आली आहे. बंदी कालावधीत यंत्रचलित व यांत्रिकी नौकांद्वारे समुद्रात मासेमारी केली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां) रायगड-अलिबाग संजय पाटील यांनी केले.

या बंदी कालावधीत सागरी कायद्याचा भंग करून मासेमारी करणारे मच्छिमार खालील कारवाईस पात्र होतील. सदर पावसाळी मासेमारी बंदी यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना लागू राहील. सदर पावसाळी मासेमारी बंदी ही पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणाऱ्या बिगर-यंत्रचालित नौकांना लागू राहणार नाही. समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सर्व यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौका १ जून २०२५ पूर्वी मासेमारी बंदरात परतणे बंधनकारक आहे. तसेच ३१ जुलै २०२५ वा त्यापुर्वी या नौकांना समुद्रात मासेमारीकरीता जाता येणार नाही.

पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करतांना यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकेस अपघात झाल्यास अशा नौकेस शासनाकडून कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळणार नाही. बंदी कालावधीमध्ये राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात मासेमारी नौकास अवागमन निषिध्द आहे. सर्व मच्छिमारी सहकारी संस्था, त्यांचे नौकामालक, सभासद व अन्य संबंधितांनी सदर प्रसिध्दी निवेदनाची नोंद घेवून विहीत बंदी कालावधीत यंत्रचलित व यांत्रिकी नौकांद्वारे समुद्रात मासेमारी केली जाणार नाही. याची दक्षता घ्यावी. अधिक माहितीकरिता कार्यालयाचा पत्ता अलिबाग कोळीवाडा, बंदररोड, कस्टम हाऊस जवळ, अलिबाग (०२१४१-२९५२२१) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन चंद्रभागा चंद्रकांत भुजबळ यांना राज्याच्या मंत्रीपदाची शपथ दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन मुंबई येथे झालेल्या एका छोटेखानी शपथविधी समारंभात राज्यपालांनी भुजबळ यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

सुरुवातीला मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी शपथविधी सोहळ्यासाठी राज्यपालांची अनुमती मागितली. त्यानंतर राज्यपालांनी छगन भुजबळ यांना शपथ दिली. शपथविधी नंतर राज्यपालांनी मंत्री भुजबळ यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीदेखील त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त
कोकण मराठी साहित्य परिषद
नवीन पनवेल शाखा आयोजित
एक कृतार्थ संध्याकाळ
साहित्यिक कार्यक्रम
कविसंमेलन
परिसंवाद
अभिष्टचिंतन सोहळा
रविवार १ जून २०२५
कविसंमेलन
दुपारी २ वाजता
मान्यवरांची उपस्थिती
मा. रामदास फुटाणे – कवी, चित्रपट निर्मिते, दिग्दर्शक
मा. अशोक नायगावकर – ज्येष्ठ हास्य कवी
मा. अरुण म्हात्रे – ज्येष्ठ साहित्यिक
परिसंवाद विषय
मा. रामशेठ ठाकूर साहेब एक बहुआयामी व्यक्तिमत्व
सायंकाळी ४ वाजता
सहभागी वक्ते
मा.डॉ.गिरीश गुणे
मा.अरुण म्हात्रे – ज्येष्ठ साहित्यिक
मा.शैलेंद्र शिर्के – संपादक
मा.डॉ.गणेश ठाकूर – प्राचार्य
वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा
सायंकाळी ४.३० वाजता
प्रमुख पाहुणे
मा. रामशेठ ठाकूर – लोकनेते, माजी खासदार
मा. मधु मंगेश कर्णिक – संस्थापक अध्यक्ष कोमसाप
मा.रामदास फुटाणे – कवी, चित्रपट निर्मिते, दिग्दर्शक
मा. अशोक नायगावकर – सुप्रसिद्ध ज्येष्ठ कवी
मा. प्रशांत ठाकूर – आमदार, पनवेल
मा. महेंद्र घरत – अध्यक्ष-रायगड जिल्हा काँग्रेस
मा. नमिता कीर – अध्यक्षा, कोमसाप
मा. डॉ. प्रदीप ढवळ – कार्याध्यक्ष, कोमसाप
मा. जे. एम. म्हात्रे – माजी नगराध्यक्ष
मा. परेशशेठ ठाकूर – मा. गटनेते पनवेल महानगरपालिका
मा. बाळासाहेब पाटील – मा. अध्यक्ष कोकण म्हाडा
मा. अरुण म्हात्रे – ज्येष्ठ साहित्यिक
मा. प्रा. एल. बी. पाटील – जनसंपर्क प्रमुख, कोमसाप
मा. सुधीर शेठ – जिल्हाध्यक्ष, कोमसाप
स्थळ: विरूपाक्ष मंगल कार्यालय, दुसरा मजला, अशोक बाग, ठाणा नाका, पनवेल
आपली उपस्थिती प्रार्थनीय
संयोजक
गणेश कोळी
अध्यक्ष- कोमसाप, नवीन पनवेल शाखा

# प्रसिद्ध पर्यटनस्थळ माथेरानला १७५ वर्षे पूर्ण

**माथेरान : प्रतिनिधी**

थंड वाऱ्याचे शहर, लाल मातीचा सुगंध, हिरवा शालू पांघरलेली डोंगररांग, गर्द वनराई, घोड्यांच्या टापांचा आवाज या वर्णनावरून साहजिकच आपल्या डोळ्यासमोर एक चित्र उभे राहिले असेल ते म्हणजे सह्याद्री घाटाच्या पर्वतरांगेत एका कुशीत वसलेले रायगड जिल्ह्यातील एक प्रदूषणमुक्त असे अद्वितीय पर्यटनस्थळ आपले माथेरान, माथेरान या अक्षरांना अस्तित्वात येऊन आज १७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. माथेरानचे नाव सध्यातरी जगाच्या नकाशावर अगदी प्रकाशझोतात आहे.



२१ मे हा माथेरानचा स्थापना दिवस. लालमातीच्या पायवाटा, खोल दऱ्या, हवीहवीशी वाटणारी शुद्ध हवा हे सगळं काही सामावले थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरान मध्ये अप्रतिम आणि मनमोहक अश्या सुंदर दृशांनी वेढलेले हे छोटेसे पर्यटनस्थळ पावसाळ्यातदेखील पर्यटकांना आकर्षित करते. हेच माथेरान पर्यटनस्थळ मुंबई पासून नव्वद किलोमीटर अंतरावर तर पुण्यापासून एकशे दहा किलोमीटर अंतरावर वसलेले आहे.

माथेरानमधील आजमितीपर्यंत पर्यटकांची संख्या वाढतच आहे. माथेरान पर्यटनस्थळी जवळपास साठ हॉटेल्स आणि पाचशे पेक्षाही अधिक लॉजिंग त्याचप्रमाणे शासकीय निवासस्थाने पर्यटकांना सेवा देत आहेत. येथील स्थानिक लोकांच्या तीन ते चार पिढ्या आजही कष्टदायक कामे करून आपल्या कुटुंबाची उपजीविका भागवत आहेत. सध्याच्या घडीला येथील नगर परिषदेच्या सभागृहात गावाचा १७५वा वाढदिवस नगर परिषदेमार्फत साजरा केला जाणार असल्याचे सांगण्यात आले.

मुंबई पुण्याहून ट्रेनने नेरळ स्थानकात उतरून टॅक्सीने माथेरानला जाता येते. नेरळ वरून काही पर्यटक पायी चालत देखील निसर्गाचा आनंद घेत माथेरान गाठतात. तसेच पावसाळी चार महिन्यानंतर नेरळ-माथेरान-नेरळ मिनिट्रेन सेवासुद्धा सुरू असते.

माथेरानमध्ये इको, मंकी, हनिमून, लुईझा, वन ट्री हिल, सनसेट, सिलिया, मलंग, अलेक्झांडर, खंडाळा, पॅनोरमा, लॉर्ड, गारबट, शारलोट तलाव असे अनेक पॉईंट आहेत.



## विश्वविक्रमी सिद्धार्थ दासचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील युवा खेळाडू सिद्धार्थ संतोष दासने एका मिनिटात मागच्या दिशेने २७४ दोरीवरच्या उड्या मारण्याचा नवा विश्वविक्रम प्रस्थापित करत आपले नाव गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदवले आहे. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल सिद्धार्थ दासचे माजी खासदार आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या वेळी सिद्धार्थचे वडील संतोष दास आणि आई शिंपा दास उपस्थित होते. सिद्धार्थच्या या विक्रमामुळे क्रीडा क्षेत्रात आणि विशेषतः दोरीवरील उड्यांच्या प्रकारात एक नवा बेंचमार्क प्रस्थापित झाला आहे. त्याच्या या यशाने अनेकांना प्रेरणा मिळाली असून, त्याने आपल्या अथक प्रयत्नांनी आणि मेहनतीने हे यश संपादन केले आहे.

# पळसदरी ठाकूरवाडीवरील धोकादायक दगड हटवण्याचे प्रयत्न





**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील खोपोली रस्त्यावर असलेल्या पळसदरी ठाकूरवाडीचे मागील बाजूस असलेले धोकादायक दगड हटवून या वाडीला दरडमुक्त करण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत. वन क्षेत्रात असलेले ते दगड हटवून वाडी मधील आदिवासी ग्रामस्थांच्या मनात निर्माण झालेली भीती दूर करण्यासाठी कर्जत पंचायत समिती आणि महसूल विभाग यांच्याकडून प्रयत्न सुरू झाले आहेत.

जुलै २०२३ मध्ये खालापूर तालुक्यातील इरसालवाडीवर दरड कोसळल्यानंतर पळसदरी ठाकूर वाडीमधील ८० आदिवासी कुटुंबाचे आठ दिवस स्थलांतरण करण्यात आले होते.या वाडीचे मागे असलेल्या वन क्षेत्रात तीन मोठे दगड जमिनीतील मातीपासून वेगळे झाल्याने कोणत्याही क्षणी ते झाली घरंगळत येऊ शकतात. या भीतीने ते दगड हलविण्यात यावेत अशी मागणी स्थानिक आदिवासी मागील दीड वर्षे करीत आहेत.

मार्च २०२४ मध्ये स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाने त्याबाबत कर्जत पंचायत समिती आणि तहसील कार्यालयाशी पत्र व्यवहार केला आहे. या धोकादायक दगडांबाबत स्थानिक ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने महसूल विभाग अलर्ट मोडवर आला आहे. तहसीलदार डॉ धनंजय जाधव यांनी पळसदरी ठाकूरवाडी मध्ये जाऊन पाहणी केली आहे. वन जमिनी मधून रस्ता करण्यात अडचणी असून तेथे झाडे आणि मोठे खडक असल्याने त्या धोकादायक दगडांपर्यंत जाण्यासाठी कोणताही वाहनांसाठी मार्ग बनविता येणार नाही.

त्यात पळसदरी ठाकूर वाडी ही शासनाच्या जिओलोजिकल सर्वेक्षणात दरड प्रवण क्षेत्र म्हणून नोंद नाही. त्यामुळे आता कर्जत पंचायत समिती कडून तेथील ग्रामस्थांच्या मनातील भीती दूर करण्यासाठी बेलदार समाजाचे दगड फोडणाऱ्यांना ते तीन धोकादायक दगड फोडण्याची कामगिरी देण्यावर प्रशासनाचे एकमत झाले आहे. वन विभागाकडून कोणत्याही प्रकारे वाहने नेण्यास आणि सुरुंग स्फोट करण्यासाठी परवानगी मिळत नाही. त्यामुळे मनुष्यबळ लावून पळसदरी ठाकूरवाडीच्या मागे धोकादायक अवस्थेत उभे असलेले दगड फोडले जाणार आहेत.

**’या ठिकाणी जे तीन मोठे दगड अडकले आहेत. ते काढण्यासाठी वाहन वरपर्यंत जाऊ शकत नाही. याबाबत खूप प्रयत्न केले परंतु तो सर्व एरिया फॉरेस्ट खात्याचा आहे. रस्ता करावयाचा झाल्यास त्या ठिकाणी मोठ्या दगडी शिळा आणि फॉरेस्ट हद्दीतील झाडे आहेत. तेथे ब्लास्टिंग केल्याशिवाय रस्ता तयार करता येणार नाही. या ठिकाणी दीर्घकालीन उपाययोजनाच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून संरक्षक भिंत बांधण्याविषयी विचार सुरू आहे.**

**– डॉ धनंजय जाधव.. तहसीलदार कर्जत**

**आम्ही आता दगड फोडणारे बेलदार समाजातील मंडळी यांचा शोध घेतला आहे. त्यांच्या कडून ते तिन्ही दगड त्याच ठिकाणी काम करून फोडण्यासाठी प्रयत्नशील आहोत. त्यातून या वाडी वर दगड कोसळण्याचा धोका दूर होईल आणि ग्रामस्थ आनंदाने राहतील.**

**–सुशांत पाटील, गटविकास अधिकारी**

# महाडमध्ये गांजाची शेती पोलिसांकडून उध्वस्त



**महाड: प्रतिनिधी**

महाड तालुक्यात एक धक्कादायक प्रकार उघड झाला असून, मोहत गावात एका व्यक्तीने परसबागेत गांजाची लागवड केल्याचे पोलिसांना समजतात या ठिकाणी कारवाई करून पोलिसांनी सदर गांजाची शेती उध्वस्त केली आहे व संबंधित आरोपीला अटक केली आहे.

याबाबत एमआयडीसी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार महाड तालुक्यातील मोहोत या गावातील श्याम सिताराम भिसे, रा. भिसे वाडी (वय ६१) याने तो राहत असलेल्या घराशेजारील परसबागेत अमली पदार्थाच्या गांजा या पिकाची लागवड केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. याप्रकरणी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या पथकाने आज १९ मे रोजी दुपारी ३:०० वाजता या ठिकाणी छापा टाकून पाच ते सहा फूट उंचीच्या हिरव्या रंगाची पाने असलेली उग्र वासाची ओलसर कांद्याची १६ झाडे जप्त केली.

त्या झाडांचे तुकडे करून । प्लास्टिकच्या कोठ्यात वजन केले असे एकूण वजन २ किलो ४८ ग्रॅम निव्वळ गांजाचे वजन १ किलो ९८८ ग्रॅम एकूण मिळून ५०,००० च्या मुद्देमाला सकट गांजाचे पिक उध्वस्त केले आहे. याप्रकरणी आरोपी विरोधात गुंगीकारक औषध द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ क, २० ब, २० ब २ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

# संजय जाधव राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्काराने सन्मानीत

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील सुरव ग्रामपंचायतीचे उपसरपंच संजय काशीराम जाधव यांना १ मे महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने आविष्कार फाऊंडेशन या सेवाभावी संस्थेतर्फे राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार २०२५ने सन्मानीत करण्यात आले.

रविवार (दि.१८) पन्हाळगड, जि. कोल्हापूर याठिकाणी झालेल्या कार्यक्रमात देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्म यांच्या नात व बँक ऑफ महाराष्ट्राच्या मुख्य प्रबंधक, डूमुनी मुर्म यांच्या हस्ते व फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार संजय पवार, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे न्यूरोसर्जन व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.संतोष प्रभू, विशेष निमंत्रित सदस्या मागासवर्गीय आयोग भारत सरकार सुरेखा लांबतुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानीत करण्यात आले.



# ऑपरेशन सिंदूर सन्मानार्थ नागोठण्यात तिरंगा रॅली





**नागोठणे : प्रतिनिधी**

भारतमातेच्या वीरांनी काश्मीर पहेलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी जे ऑपरेशन सिंदूर राबविण्यात आले त्यांच्या सन्मानार्थ मंगळवार दि. २० मे रोजी सकाळी १० वाजता असंख्य राष्ट्रप्रेमी नागरिकांच्या उपस्थितीत नागोठणे छत्रपती शिवाजी महाराज चौक पासून बाजारपेठ मार्ग खुमाचा नाका गांधीचौक मार्गे नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर पर्यंत तिरंगा रॅली काढण्यात आली.

दरम्यान राष्ट्रप्रेमी नागरिकांकडून भारतीय सैन्य दलाला दहशतवादी संघटने विरोधात लढा देण्यासाठी बळ येऊ दे अशी प्रार्थना श्री जोगेश्वरी मातेस करण्यात आली. रॅलीच्या प्रारंभी माजी सैनिक उदंड रावकर, यशवंत चित्रे, भानुदास मेहता, अमृत गदमले, प्रवीण शिर्के, राजेंद्र भोईर आदिंना सन्मानित करण्यात आले.

या रॅलीमध्ये राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, शिवरामभाऊ शिंदे, हरीशशेठ काळे, विलास चौलकर, लियाकतशेठ कडवेकर, भाजप जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, सोपान जांबेकर, श्रेया कुंटे, रोहा ता. अध्यक्ष महेश ठाकूर, ता. सरचिटणीस एकनाथ ठाकूर, आनंद लाड, नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी, माजी सैनिक उदंड रावकर, यशवंत चित्रे, महिला ता. अध्यक्ष अपर्णा सुटे, प्रियांका पिंपळे, ता. क्रीडा संयोजक शेखर गोळे, अल्पसंख्यांक ता. अध्यक्ष राउफ कडवेकर, निखिल मढवी, दिनेश घाग, प्रविण ताडकर,बिपीन सोष्टे, जयराम पवार, नामदेव लाड, बाळाराम पोटे, दिपक गायकवाड, विवेक रावकर, अशोक अहिरे, धनराज उमाळे, विठोबा माळी, ऍड. रमेश जाधव, गणेश जाधव, तिरत पोलसानी, भरत गिजे आदिंसह असंख्य राष्ट्रप्रेमी नागरिक सहभागी झाले होते.

या रॅलीत राष्ट्रप्रेमी नागरिकांनी हातामध्ये भारताचा तिरंगा घेऊन भारतमाता की जय, छत्रपती शिवाजी महाराज की जय, भारतीय जवानांचा विजय असो, भैरतीय सैन्यदलाचा विजय असो, जय जवान जय किसान अशा जोशपूर्ण घोषणा देण्यात आल्या. या रॅली दरम्यान नागरिकांना देशभक्तीचा संदेश देण्यात आला.

# राजपुरी कोळीवाडयात पंचांनी कुटुंबाला टाकले वाळीत

मुरुड : प्रतिनिधी

मुरुड तालुक्यातील राजपुरी ग्रामपंचायत हद्दीत राजपुरी कोळीवाडा परिसर असून येथे मोठ्या प्रमाणात कोळी समाजाची वस्ती आहे.जगदीश भास्कर आंबटकर व त्यांचे कुटुंब या भागात रहात आहे. लग्नाच्या वराती मध्ये जगदीश आंबटकर यांना समाजातील काही लोकांनी मारहाण केली होती.या बाबत त्यांनी मुरुड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.सदरची केस मिटवण्यासाठी झालेला समाजाला खर्चाची रक्कम जगदीश आंबटकर यांनी देऊ करावी यासाठी पंच मंडळी यांनी तगादा लावला होता. परंतु आंबटकर यांनी रक्कम न दिल्यामुळे अखेर त्यांना बहिष्कृत करण्यात आल्याची तक्रार त्यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्याकडे मांडली आहे.

जगदीश आंबटकर यांचा चार चाकी वाहन देण्याचा व्यवसाय होता परंतु पंच मंडळींनी यांच्याकडून कोणीही गाडी भाड्याने घेऊ नये अशी हाक दिल्याने त्यांचा हा सुधा व्यवसाय बंद पडला. अखेर त्यांना गाडी विकावी लागली.तद्नंतर पंच मंडळींनी समाजात होणारी लग्न कार्य,दुखकार्य या मध्ये आंबटकर यांना सहभागी होण्यास बंदी घालून त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. त्यामुळे त्यांना जगणे आता असह्य झाल्याने अखेर त्यांनी २६ मे पासून मुरुड पोलिस ठाण्यासमोर ते आपल्या कुटुंबासह उपोषणास सुरुवात करणार आहेत.याबाबतचे रीतसर निवेदन त्यांनी रायगड जिल्हाधिकारी,जिल्हा पोलिस अधीक्षक,मुरुड पोलिस ठाणे,मुरुड तहसीलदार यांना देण्यात आले आहे.

गाव पाटील रमेश पाटील,मुरलीधर घागरी,धनंजय गीदी,विजय गीदी ,घनश्याम घागरी,नारायण आगरकर,गणेश मोनाक,

चंद्रकांत मोन्नाक, भास्कर सिताराम बाणकोटकर, प्रसाद केशव आंबटकर, तुकाराम कृष्णा चव्हाण, गोपाळ चिंतामणी कुणबी, उत्तम चांग्या नागुटकर, विष्णू लखमा कुणबी, हेमंत लक्ष्मण आंबटकर, नरेश नरहरी गिदी, नारायण पद्मा चव्हाण, मुरलीधर बाळकृष्ण आंबटकर, मंगेश मधुकर कुणबी, मनोज कृष्णा कुणबी, नरेश रामदास आगरकर, चंद्रकांत पद्मा चव्हाण या पंचावर बहिष्कृत केल्याचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी करत आपली ही मागणी मंजूर न झाल्यास मी स्वतः माझ्या कुटुंबासह २६ मे २०२५ पासून मुरूड पोलीस ठाण्यासमोर माझे उपोषण सुरु करणार आहे अशी कैफियत त्यांनी आपल्या निवेदनातून मांडली आहे. या माझ्या बहिष्कृत प्रकरणाबाबत

मुरूड पोलिसांनी पंच मंडळी यांना समजवून सुध्दा राजपुरी कोळीवाडा पंच ऐकत नाहीत. त्यामुळे माझ्यावर होत असलेल्या अन्याय बाबत मला उपोषणास बसावे लागत असल्याचे प्रतिपादन जगदीश आंबटकर यांनी केले आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे-मानघर , तालुका-पनवेल ,जि-रायगड येथील सामाईक जमीन मिळकत हि कै. गणपत महादू पाटील यांचा हिस्सा (१/४) त्यांचे कायदेशीर वारस १) ज्ञानेश्वर गणपत पाटील आणि २) कुसुम गणपत पाटील यांच्या हिस्स्यातील तसेच कै. महादू काथोड पाटील (यांचा १/४ हिस्सा ) यांचे कायदेशीर वारस १) संजय महादू पाटील २) जनाबाई महादू पाटील , ३) कमल महादू पाटील , ४) मंदा महादू पाटील ,५) कै. राघी महादू पाटील तर्फे कायदेशीर वारस १) राजेंद्र कान्हा पाटील , २) अरुणा दत्तात्रेय ठाकूर , ३) करुणा बळीराम पाटील ,४) कै. कल्पना धनाजी म्हसकर तर्फे कायदेशीर वारस १) पूजा धनाजी म्हसकर ,२) विशाखा धनाजी म्हसक, ३) साक्षी धनाजी म्हसकर ,४) सिद्धिका धनाजी म्हसकर यांच्या मालकीची ,ताबेकब्जातील, वापरातील व वाहिवाटीतील त्यांच्या कायदेशीर हिश्श्याचे क्षेत्र असलेली खालील परिशिष्टात वर्णन केलेली शेतजमीन आमचे अशील श्री. मंगेश वामन भोईर आणि कंपनी हे कायम स्वरूपी नोंदणीकृत खरेदिखत करणेचा व्यवहार ठरविला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - मानघर, तालुका - पनवेल, जि. रायगड**

| गाव | सर्वे . नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| मानघर | २१/०<br>५८/० | १-०९-१३<br>०-७०-३० | १४.६०<br>९.९७ |

सदरहू शेतजमीन या मिळकतीमध्ये अन्यकोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क,विकसनकरार ,हितसंबंध,कुळ,वहिवाट,ताबा,कब्जा,इंजमेंट,साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीसीच्या तारखेपासून २१ दिवसाचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर, समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात याप्रमाणे विहित मुदतीत कोणत्याही हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकत हि निर्वेध व बोजारहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे असे गृहीत धरून आम्ही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदिखताचा व्यवहार पूर्ण करतील

सही /

ठिकाण: पनवेल
दिनांक: २१/०५/२०२५

**अँड.पल्लवी अमृत मानकर**
बी.कॉम.,एल.एल.एम.,डी.सी.एल.
कार्यालयीन पत्ता : शॉप नं.१,आकाशदीप बिल्डींग, ऑपो. कनक सरोवर, ठाणा नाका रोड, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. **मो. ८८३०४४८२९१**


# पाण्यासाठी नवी मुंबई पालिकेला द्यावे लागणार २७८३.३७ कोटी

**नवी मुंबई : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील पोशीर प्रकल्पास ६३९४.१३ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकाच्या प्रशासकीय मान्यतेस मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पाचे पाणी मुंबई महानगर, नवी मुंबई, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर आदी शहरांना पिण्याच्या पाण्याकरिता पुरविले जाणार आहे. त्यामुळे पाणी वापर आधारित लाभधारक संस्थांची भांडवली खर्चातील हिस्सेदारी निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (३३.९६ टक्के, २१७१.४५ कोटी रूपये),नवी मुंबई महानगरपालिका (४३.५३ टक्के, २७८३.३७ कोटी रूपये), उल्हासनगर महानगरपालिका (९.५६ टक्के, ६११.२८ कोटी रूपये),अंबरनाथ नगर परिषद (७.०७ टक्के, ४५२.०६ कोटी रूपये), बदलापूर नगर परिषद (५.८८ टक्के, ३७५.९७ कोटी रूपये)या संस्थांना खर्चातील हिस्सेदारी निश्चित करून देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे कर्जत येथील शिलार प्रकल्पासाठी नवी मुंबई महानगरपालिका (भांडवली खर्चातील हिस्सेदारी टक्केवारी ९.५, रक्कम ४६२.६२ रूपये कोटीत) निश्चित करून देण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मौजे कुरूंग गावाजवळ पोशीर नदीवर १२.३४४ टी.एम.सी.चे धरण बांधणे प्रस्तावित आहे. प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठा ९.७२१ टी.एम. सी.आहे. त्यापैकी पिण्यासाठी ७.९३३ टी.एम.सी. आणि औद्योगिक वापरासाठी १.८५९ टी.एम.सी. पाणी वापर प्रस्तावित आहे. हा प्रकल्प कोकण पाटबंधारे विकास महामंडळद्वारे ठेव तत्त्वावर उभारण्यात येणार आहे. हा प्रकल्प राबविण्याकरिता कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण, नवी मुंबई महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, अंबरनाथ नगर परिषद, बदलापूर नगर परिषद यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाचे महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे.

# शाळेच्या आठवणीत रंगले माजी विद्यार्थी

**माणगाव : बातमीदार**

शाळेच्या आठवणी नेहमीच आपल्याला गोड आनंद देऊन जातात. अशाच आठवणींमध्ये शाळेचे मित्र-मैत्रिणी म्हणजे निरागसता आणि आपुलकीचं स्नेहबंधन असतं. आपण जसजसे मोठे होतो, तसतसं आपण या गोष्टींपासून दुरावत जातो. पण पुन्हा एकदा एकत्र यावं, त्या निखळ आनंदाकडे पाहावं, हीच शुद्ध भावना आपल्याला पुन्हा जवळ आणते.

ना. म. जोशी विद्याभवन, गोरेगाव दहावी (अ) २००३’ या बॅचमधील सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी एकत्र येऊन, ‘आपलं गेट टुगेदर’ हा कार्यक्रम साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक, वडघर, माणगाव येथे मोठ्या दिमाखात पार पाडला.

या स्नेहसंमेलनात सर्वांनी एकत्र येऊन जुन्या शाळेच्या आठवणींना उजाळा दिला. गंमतीदार खेळ खेळून प्रत्येकाने मनमुराद आनंद घेतला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक प्रविण धाडसे यांनी केलं. त्यांच्या शब्दसुमनांनी सर्वांची मनं जिंकली. त्यांनी सादर केलेली स्वयंरचित ‘शाळा’ ही कविता प्रत्येकाच्या मनात घर करून गेली. कार्यक्रमाचे आयोजन नीलाक्षी ढेकणे यांनी केलं होतं.

या स्नेहसंमेलनास स्वप्नील मोरे, सागर थरवळ, प्रतीक गांधी, नीलाक्षी ढेकणे, नीलिमा चव्हाण, कौस्तुभ गांधी, अपर्णा म्हात्रे, नेहा मेहता, सनील बेर्डे, आदित्य राठोड, मनाली मेहता, सुजीत भाताखंडे,व इतर विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.


## पनवेल महानगरपालिका शिक्षण विभाग

**लोकनेते दि.बा.पाटील विद्यालय, इआगरी समाज हॉल व दांडेकर हॉस्पिटल समोर, पनवेल- ४१० २०६.**

Email- msbpanvel1993@gmail.com | Email : panvelcorporation@gmail.com

जा.क्र.पमपा/शिक्षण / ३२९/२०२५ | दिनांक - २०/०५/२०२५

**अंदाजपत्रक बनविणेकामी**

| अनु. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | दरपत्रक/पमपा/शिक्षण/प्र.क्र.०१/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शाळेचा गणवेश, पीटी गणवेश, काळे शुज, पीटी शुज, पावसाळी सॅन्डल, सॉक्स, वॉटर बॉटल, छत्री, रेनकोट, दप्तर, (सर्व नामांकित कंपनी) साहित्य प्रत्येकी नग दर. |

या निविदेबाबतची माहिती वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि.२१/०५/२०२५ ते दि. २७/०५/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत शिक्षण विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/**
**प्र.क्र.२०८/२११/२०२५**
**दिनांक :- २०/०५/२०२५**

**सही/-**
**शिक्षणाधिकारी पनवेल**
**महानगरपालिका**

## निवडक

### घरफोडीत दागिने केले लंपास

**पनवेल :** चोरट्याने कळंबोलीत घरफोडी करत सव्वा लाखांचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. या प्रकरणी कळंबोली पोलीस अधिक तपास करत आहेत. गौरव बेलोटे सेक्टर ३ इ, कळंबोली येथे राहत असून १५ मे रोजी ते सर्वजण कामावर गेले. त्यानंतर दुपारी यांच्या मुलाला ताप आल्याने ते त्याला दवाखान्यात घेऊन गेले. सर्वजण सायंकाळी साडेपाचच्या सुमारास दवाखान्यातून घरी आले असता घराचा लोखंडी दरवाजाचा लॉक तुटलेला दिसला. चोराने कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेले दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली.

### अंगणवाडी सेविका सेवानिवृत्त

**उरण :** तालुक्यातील गोवठणे गावातील अंगणवाडी सेविका



मंदा श्रीराम म्हात्रे (मंदा काकू २९ वर्षाच्या प्रदीर्घ सेवे नंतर अंगणवाडी सेविका म्हणून सेवानिवृत्त झाल्या आहेत. २९ वर्षाच्या प्रदीर्घ सेवा पूर्ण झाल्याने त्यांना सारडे गावी माहेरी बोलाऊन त्याचे वडील ध. प. पाटील गुरुजी व भाऊ अजित पाटील व बहिण अनुताई यांनी सत्कार करून भेट वस्तू देऊन पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या आहेत. २९ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर अंगणवाडी सेविका मंदा म्हात्रे व शंकूतला पाटील सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा कुटुंबियांतर्फे सत्कार करण्यात आला.

### खासदार बारणेंना निवेदन



**पनवेल :** करंजाडे शहरातील नागरिकांना भेडसावत असलेल्या अंतर्गत रस्त्यांच्या कामांबाबत मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे, आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सदर कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी सिडकोला निर्देश देण्याची विनंती करण्यात आली.या भेटीवेळी शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख अतुल भगत, उपजिल्हाप्रमुख विनोद साबळे, तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील, उपतालुकाप्रमुख गौरव गायकवाड, शहरप्रमुख मिरेंद्र शहारे, उपशहरप्रमुख अक्षय टिके, तसेच से.-४ शाखाप्रमुख राजाभाऊ नलावडे उपस्थित होते.

### तोंडरे येथून दुचाकीची चोरी

**पनवेल :** मोटरसायकल पार्क करून हळदीच्या कार्यक्रमासाठी गेले आणि चोराने मोटरसायकल पळून नेल्याची घटना तोंडरे येथे घडली. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अजय सोंडकर हे धरणा कॅम्प येथे राहत असून त्यांनी होंडा सीबी शाईन ही मोटरसायकल मित्राची तोंडरे येथे हळद असल्याने दुर्गा माता मंदिरा शेजारील मोकळ्या शेतात पार्क केली. रात्री साडेअकराच्या सुमारास ते पार्क केलेल्या मोटरसायकलच्या जवळ आले असता मोटरसायकल दिसून आली नाही. आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला मात्र मोटरसायकल सापडली नाही.

### कामगार संपत कदम सेवानिवृत




**उरण :** तालुक्यातील ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड मोरा येथील कामगार संपत बापू कदम हे ३५ वर्षे प्रदीर्घ सेवेतून नुकताच निवृत्त झाले आहेत. त्यांनी गेली वर्षे मेंटेनन्स डिपार्टमेंटमध्ये काम केले. मोरा प्लांट चे प्रमुख राहुल देशक यांनी संपत कदम यांना सन्मानपत्र,शाल ,पुष्पगुच्छ ,स्वीट देवून सन्मान करण्यात आला. श्रमिक सेना युनियन ,सेफ्टी डिपार्टमेंट, मेंटेनन्स डिपार्टमेंट आदि डिपार्टमेंटच्या वतीनेही सत्कार करण्यात आला.

# उलवेत विवाहितेची हत्या

## भररस्त्यात चिरला गळा

**पनवेल : वार्ताहर**




उलवेमध्ये राहणाऱ्या विवाहितेचा अज्ञात मारेकऱ्याने भररस्त्यात गळा चिरून तिची हत्या केल्याची खळबळजनक घटना उलवे, सेक्टर-५ मध्ये घडली. या घटनेनंतर सदर मारेकरी पळून गेला असून उलवे पोलिसांनी त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेतील मृत विवाहितेचे नाव अलवीना किशोरसिंग उर्फ अलवीना अदमली खान (वय २७) असे आहे. अलवीना पती किशोरसिंग राजपूत याच्यासोबत उलवे, सेक्टर-५ मधील विजय लक्ष्मी टॉवरमध्ये राहत होती. अलवीना आणि तिचा पती किशोरसिंग दोघेही परतत होती. अलवीना सेक्टर-५ मधील मुख्य रस्त्यावर उतरुन ५० मीटर अंतरावर असलेल्या घराच्या दिशने पायी चालत जात होती.

याचवेळी तिच्या मागावर असलेल्या अज्ञात मारेकर्याने तिला रेडीयन्स स्प्लेंडर बिल्डींगसमोर गाठून तिच्या गळ्यावर धारदार चाकुने वार केले. त्यामुळे अलवीना गंभीर जखमी अवस्थेत त्याचठिकाणी कोसळल्यानंतर मारेकर्याने तेथून पलायन केले. सदर प्रकार त्या परिसरातील काही नागरीकांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेतली, मात्र अलवीना या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्याने तिचा काही वेळातच मृत्यू झाला.

उलवे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन अलवीनाचा मृतदेह ताब्यात घेतला. अलवीनाची हत्या करणारा आरोपी ओळख पटू नये यासाठी तोंडावर रुमाल बांधून आल्याचे परिसरातील नागरिकांचे म्हणणे आहे. त्यानुसार उलवे पोलिसांनी अज्ञात हल्लेखोरांविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. सीसीटीव्हीवरून आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे.

# क्रिफ्टो करन्सीद्वारे महिलेला ७८ लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील विवाहितेला फेसबुकद्वारे ओळख झालेल्या सायबर चोरट्याने या विवाहितेला क्रिप्टो करन्सीमध्ये मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत तिच्याकडून तब्बल ७८ लाख ८२ हजाराची रक्कम उकळून तिची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणी सायबर चोरट्याविरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करुन या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेली ५३ वर्षीय महिला खारघरमध्ये राहण्यास असून २०२० मध्ये या विवाहितेला जुबेर खान नामक व्यक्तीच्या फेसबुकवर तुम्ही सुध्दा पैसे कमवू शकता, अशा प्रकारची जाहिरात निदर्शनास आली होती. सदर विवाहिता आर्थिक आर्थिक अडचणीत असल्यामुळे त्यांनी जुबेर खान याच्याशी संपर्क साधला होता. त्यावेळी जुबेर खान याने या विवाहितेला द चॅम्प कॉईन आणि नंतर बायनान्स ॲप डाऊनलोड करण्यास सांगून त्यांना वेगवेगळ्या क्रिफ्टो टोकन्समध्ये गुंतवणूक करण्यास सांगितले. त्यानुसार या विवाहितेने ३ ऑक्टोबर २०२० ते २५ मार्च २०२५ या कालावधीत आपल्या बँक खात्यातून जुबेर खानच्या बँक खात्यात एकूण ७८ लाख ८२ हजार रुपये पाठवले. त्यापैकी फक्त तीन लाख ५१ हजार रुपये जुबेर खान याने परत केले. त्यामुळे या विवाहितेने उर्वरित रक्कम परत मागितली असता, त्याने आणखी २६ लाख ७० हजार रुपये भरल्याशिवाय पैसे परत मिळणार नाहीत, अशी धमकी दिली. फसवणूक झाल्याचे समजल्यानंतर या विवाहितेने खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

# इसांबे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे सचिन थोरवे बिनविरोध





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुक्यातील इसांबे ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे सचिन शिवाजी थोरवे यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी सचिन थोरवे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आणि इसांबे गावाच्या विकासकामांसाठी पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तसेच भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनीही सचिन थोरवे यांचे अभिनंदन केले.

उपसरपंचपदाच्या निवडणुकीच्या वेळी एकमताने सचिन थोरवे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यांच्या बिनविरोध निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या वेळी खालापूर तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे, ग्रामसेवक परेश नागरे, सरपंच हिरामण वाघे, सदस्य ज्योती विलास पाटील, सारिका मधुकर शिनगारे, गजानन हुशार, वामन वाघे, समीर देवघरे, मयूरी देवघरे, भाजप नेते मनोज थोरवे, प्रभाकर जाधव, अतुल शेलार, यांच्यासह लोहोप, इसांबे, वाणीवली, इसांबेवाडी आणि लोहप वाडीतील ग्रामस्थ मंडळ उपस्थित होते.

# खारघर शहर दारूमुक्त करण्यासाठीचे उपोषण मागे

**पनवेल : वार्ताहर**

खारघर शहर दारूमुक्त व्हावे, यासाठी सहयोग सेवाभावी संस्था आणि खारघरमधील नागरिकांच्या वतीने जनआंदोलन उभारण्यात आले आहे. या आंदोलनाच्या अंतर्गत रविवारी खारघरमध्ये सांकेतिक उपोषण करण्यात आले. या उपोषणाला आमदार प्रशांत ठाकूर व आमदार विक्रांत पाटील यांनीही उपाषेणकर्त्यांची भेट घेतली. आंदोलकांशी संवाद साधला, यानंतर संघर्ष समितीने आपले एक दिवसीय लाक्षणिक उपोषण सध्या मागे घेतले आहे.

राज्य शासनाने खारघर शहर दारूमुक्त घोषित करावे, यासाठी संघर्ष समिती गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्नशील आहे. २००७ पासून मोर्चे, आंदोलने आणि शासनाकडे पत्रव्यवहार समितीने केले आहेत. याच मागणीसाठी १८ मे रोजी खारघरमधील शिल्प चौकात एकदिवसीय सांकेतिक उपोषण आयोजित करण्यात आले होते, ज्याला खारघरवासियांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या आंदोलनात सर्वपक्षीय कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी झाले होते.



# पनवेलमध्ये शुक्रवारपासून अभिनय प्रशिक्षण शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने सात दिवसांचे अभिनय प्रशिक्षण शिबिर पनवेल येथे आयोजित करण्यात आले आहे. महानगपालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात २३ मे पासून या शिबिराची सुरुवात होणार आहे. या शिबिरामध्ये नाट्य व सिनेक्षेत्रातील दिग्गज मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.



पनवेलमधील नाट्यकलावंतांना अभिनयासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांचा विकास होण्यासाठी योग्य प्रशिक्षण मिळावे याकरिता महापालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी महापालिकेमार्फत पुढाकार घेऊन आखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेच्या सहकार्यातून सर्वांसाठी विनामूल्य असे हे अभिनय प्रशिक्षण शिबिर आयोजित केले आहे.

२३ मे ते ३० मे दरम्यान हे शिबिर होत आहे. २३ मे रोजी दुपारी ३ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत या अभिनय शिबिराचे उद्घाटन होणार आहे. पनवेल महानगरपालिका हद्दीतील नाट्य कलाकारांना मोठे व्यासपीठ मिळावे व त्यांमधून पनवेलचे नाव राज्यात सर्वत्र पोहचावे याकरिता नाट्यपरिषद विविध उपक्रम सातत्याने राबवित असते.

पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने दोन गटात हे अभिनय शिबिर घेण्यात येणार आहे. यामध्ये पहिला गट वय वर्षे ८ ते १६ व दुसरा गट १६ ते ६० वयांपर्यंत आहे. सकाळी १० ते १ व दुपारी २ ते पाच अशा दोन टप्प्यात सात दिवस हे अभिनय शिबिर होणार आहे. शिबिरासाठी प्रत्येक गटामध्ये ३० /३० प्रशिक्षणार्थी आहेत.

नाट्य, सिने क्षेत्रातील मान्यवर यामध्ये संजय हळदीकर (सोलापूर), रवी धुतडमल(एनएसडी दिल्ली),संकेत खेडकर (एनएसडी दिल्ली), अमोल भावे (ठाणे) आदी तसेच इतरही दिग्गज कलावंताचे मार्गदर्शन या शिबीरात होणार आहे. शेवटच्या दिवशी सर्व सहभागी शिबीरार्थींचे सादरीकरण होणार आहे. या अभिनय शिबिराचा समारोपप्रसंगी ३० मे ला मान्यवरांच्या उपस्थितीत होईल. सर्व शिबिरांर्थींना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

> **पनवेलमधील नाट्यकलावंतांना अभिनयाचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण मिळावे याकरिता अशा प्रकारचे शिबिर घेणे आवश्यक आहे आणि त्यासाठी महानगरपालिकेने पुढाकार घेऊन आखिल भारतीय नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेच्या सहकार्यातून हे अभिनय प्रशिक्षण आयोजित केले आहे. पनवेलमधील अभिनय प्रशिक्षणानंतर याच पध्दतीने खारघरमध्येही अभिनय प्रशिक्षण घेण्यात येणार आहे.**
>
> **-परेश ठाकूर,**
> **अ.भा. मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष तथा माजी सभागृह नेते**

# नियंत्रण कक्षाअभावी कर्मचाऱ्यांची गैरसोय

**पनवेल : वार्ताहर**

जलवायू विहार सोसायटी समोरील पदपथावरील परिवहन विभागाने नियंत्रण कक्ष उचलून नेल्याने कर्मचाऱ्यांना सिमेंट कठड्यावर बसून कामकाज करावे लागत आहे. या नियंत्रण कक्षाचा त्रास होत असल्याची तोंडी तक्रार एका महिलेने पनवेल महापालिकेकडे केली होती. त्यानुसार हे कक्ष पनवेल पालिकेने हलविले होते, मात्र त्यानंतर नवी मुंबई परिवहन विभागाने हे कक्षच उचलून नेल्याने एनएमएमटी कर्मचाऱ्यांची गैरसोय होत आहे.

सिडकोने खारघर शहराची निर्मिती केल्यावर लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात भर पडू लागली आहे. खारघरमधून नोकरी आणि उद्योग व्यवसायासाठी मुंबईसह नवी मुंबईत जाणार्या चाकरमान्यांना नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन सेवेचा मोठ्या प्रमाणात लाभ होतो. सध्या खारघरमधून डोंबिवली, ठाणे, वाशी-घणसोली, मंत्रालय, बेलापूर तसेच खारघर रेल्वे स्थानक ते खारघर जलवायू मार्गे तळोजा वसाहत मार्गावर विविध क्रमांकाच्या बसेस धावतात.

सर्व बसेस नियंत्रणासाठी काम करणारे कर्मचारी हे उन्ह-पावसात मिळेल त्या जागेत बसून नियंत्रण करीत होते. त्यामुळे वाहक आणि चालकांच्या सोयीसाठी परिवहन विभागाकडून जलवायू विहार येथे नियंत्रण कक्ष उभारण्यात आले होते. या कक्षामधून एनएमएमटीच्या बसेसचे कामकाज केले जात होते.

# ७० हजारांचा मोबाईल चोरला

**पनवेल : वार्ताहर**

पायी चालत जाणाऱ्या महिलेच्या सॅक बॅगमधून ७० हजार रुपये किमतीचा आयफोन चोरून नेल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सायली बाळाराम म्हात्रे या आसुडगाव येथे राहत असून त्या पटेल ज्वेलर्स येथे नोकरी करतात. त्यांनी आयफोन सॅक बॅगमध्ये ठेवला होता. पनवेल एसटी स्टँड येथून पायी चालत गुणे हॉस्पिटलच्या जवळील भाजी मार्केटच्या रोडवर बसलेल्या महिलेकडून त्यांनी करवंदे घेतली. त्यावेळी पैसे काढून त्या महिलेला दिले आणि बॅगची चैन लावली. त्यावेळी त्यांचा मोबाईल फोन बॅगेत होता. त्यानंतर त्या छत्रपती शिवाजी महाराज चौक, कर्मवीर भाऊराव पाटील चौक येथून पायी चालत जात पटेल ज्वेलर्स येथे आल्या आणि बॅगेत ठेवलेला मोबाईल घेण्यासाठी गेल्या असता बॅगची चैन उघडी होती. आणि बॅगेत मोबाईल नव्हता. चोरट्याने मोबाईल चोरून नेला.

# मोकाट कुत्र्याच्या हल्ल्यात एक जखमी

**पनवेल : वार्ताहर**



खारघर परिसरात मोकाट कुत्र्यांच्या उपद्रवाने ग्रामस्थ आणि रहिवासी त्रस्त असून, पालिका प्रशासनाने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी केली जात आहे.

सेक्टर १० मधील रंजीत जोगी हे सायकलिंगसाठी गेले असता, कस्तुरी इमारतीसमोरील पदपथावर बसलेल्या एका मोकाट कुत्र्याने जोगी यांच्या डाव्या पायाला चावा घेतल्याने त्यांना दुखापत झाली आहे. सेक्टर १० परिसरातील रहिवाशांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दररोज रस्त्यावर मोकाट कुत्र्यांची टोळी बसलेली असते. कुत्र्यांच्या भीतीपोटी लहान मुलांना सोसायटीच्या बाहेर पडणे मुश्कील झाले आहे. कोपरा गाव आणि वसाहत सेक्टर १० वसविण्यात आली आहे.

कोपरा गावातही मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे. परिसरात रात्रीच्या वेळी रस्ते आणि पदपथावर वडापाव, चायनीज अशा खाद्यपदार्थांच्या हातगाड्या असतात. रात्री शिल्लक असलेले टाकाऊ पदार्थ तेथेच फेकले जातात. मोकाट कुत्र्यांना खाद्यपदार्थ उपलब्ध होत असल्यामुळे कुत्र्यांच्या संख्येत वाढ होत असल्याचे रहिवाशांनी सांगितले. त्यामुळे महापालिकेने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी केली जात आहे.

# रायगडातील समस्या निराकरणासाठी उच्चस्तरीय बैठक

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

खासदार धैर्यशील पाटील यांच्या सूचनेनुसार सोमवारी (दि.१९) जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड येथे एक महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत रायगड जिल्ह्यातील विविध प्रशासकीय, पर्यावरणीय व नागरी प्रश्नांवर चर्चा करण्यात आली व त्यावर उपाययोजना निश्चित करण्यात आल्या.



या बैठकीस माजी आमदार पंडितशेठ पाटील, आस्वाद पाटील, तसेच अप्पर जिल्हाधिकारी थोरवे, उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके, वनविभागाचे अधिकारी राहुल पाटील याशिवाय जिल्ह्यातील सर्व प्रांताधिकारी, तहसीलदार व संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारीदेखील बैठकीस उपस्थित होते.

या बैठकीत प्रमुख्याने वनजमिनीवरील अतिक्रमण, ग्रामविकास योजनांची अंमलबजावणी, आपत्ती व्यवस्थापन, आरोग्य सेवा सुधारणा, तसेच आदिवासी व दुर्गम भागांतील मूलभूत सोयी-सुविधा पुरवठा या बाबींचा समावेश होता. सर्व संबंधित अधिकाऱ्यांना ठोस कार्यवाहीसाठी निर्देश देण्यात आले. खा. धैर्यशील पाटील यांनी सांगितले की, विकास हे केवळ योजनांच्या माध्यमातून नव्हे, तर स्थानिक प्रशासनाच्या प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून आहे. सामान्य नागरिकांचे प्रश्न वेळेत आणि योग्य पद्धतीने सोडवणे हीच आपली जबाबदारी आहे. ही बैठक जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वयाचे उत्तम उदाहरण ठरली आहे. यामधून आगामी काळात रायगड जिल्ह्यातील नागरी सुविधा व प्रशासन कार्यक्षमता सुधारण्यास निश्चितच हातभार लागेल.



**पनवेल : प्रबुद्ध सामाजिक संस्था करंजाडे-पनवेल वतीने बुद्ध पौर्णिमा साजरी करण्यात आली. रविवारी प्रबुद्ध सामाजिक संस्थेचे धम्मबांधव धम्मभगिनींच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला.**

## संपादकीय

# मान्सूनपूर्व पावसाचा फटका

**यावर्षीचा मान्सून चांगला होणार असल्याचा विश्वास देशाच्या हवामान विभागाने यापूर्वीच व्यक्त केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा उंचावलेल्या असतानाच तूर्तास मात्र अवकाळी आणि मान्सूनपूर्व पावसाने राज्यभराला झोडपले आहे. अवेळी आलेल्या पावसामुळे प्रशासन, शेतकरी आणि सामान्य नागरिकांनाही पूर्वतयारीसाठी फारसा वेळ मिळालेला नाही. त्यामुळेच शेतीमाल, पिके आणि अन्य स्वरूपाचेही नुकसान होताना दिसते आहे. पावसाचा लहरीपणा लक्षात घेऊन इथून पुढे आधीच तयारी करायला हवी.**

कोकणासह मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत मंगळवारी वळवाच्या पावसाने दमदार हजेरी लावली असतानाच कर्नाटक लगतच्या समुद्रात निर्माण होत असलेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम म्हणून राज्यात येत्या दहा दिवसांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. जूनपासून सप्टेंबरपर्यंत पाऊस सामान्यपेक्षा अधिक राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे हवामान विभागाने अधिक अचूक आणि तपशीलवार अंदाज यंदा सादर केला आहे. त्यानुसार यंदाच्या मान्सूनचे प्रमाण १०६ टक्के राहणार आहे. चांगल्या मान्सूनमुळे कृषी उत्पादनात वाढ होण्याची आशा निर्माण झाली असतानाच तूर्तास अवकाळीमुळे राज्यात पिकांचे नुकसान झाले आहे. आता ३१ मेपर्यंत राज्यभरात मान्सूनपूर्व पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. पुण्यात मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशी जोरदार पावसाने हजेरी लावली. यातच वाघोलीजवळ सणसवाडी येथे होर्डिंग कोसळल्याची घटना घडल्याने मुंबईतील भीषण होर्डिंग दुर्घटनेच्या आठवणी जाग्या झाल्या. अलीकडे पाऊस आणि वाऱ्याच्या माऱ्यात होर्डिंग कोसळण्याच्या घटना इथे-तिथे घडल्याचे समोर येत असते. मुंबईतील दुर्घटनेनंतर सर्व होर्डिंगच्या सुरक्षिततेचा आढावा घेण्याचे आदेश देण्यात आले होते. तरीही अशा दुर्घटना घडतच आहेत. सुदैवाने पुण्यातील घटनेत कुणीही जखमी झालेले नाही. सात-आठ दुचाकी तेवढ्या होर्डिंगखाली अडकल्याची माहिती आहे. परंतु ठिकठिकाणच्या स्थानिक प्रशासनाने यासंदर्भात नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने खबरदारी घेण्याची गरज आहे. काही ठिकाणी बाजार समित्यांच्या अपुऱ्या सुविधेमुळे शेतकऱ्यांचा शेतमाल पावसात भिजल्याच्या किंवा वाहून गेल्याचेही दिसते आहे. शेतमालासाठी पुरेशा शेड का उभारल्या जात नाहीत हे अनाकलनीय आहे. अचानक आलेल्या पावसामुळे होणारे शेतकऱ्यांचे हे नुकसान टाळता आले नसते का? व्यापाऱ्यांनी वेळेत माल न हलवल्याने असे प्रकार वारंवार घडतात असे सांगितले जाते. नैसर्गिक आपत्तीपासून शेतमालाचे संरक्षण करण्याची जबाबदारी बाजार समिती व स्थानिक प्रशासनाने उचलायलाच हवी. पेरणीपासून विक्रीपर्यंत शेतकऱ्याने संकटांचाच सामना करायचा का, असा सवाल यामुळे शेतकरी करीत आहेत. यंदा पावसाचे आगमन अपेक्षेपेक्षा लवकर झाल्याने अनेक ठिकाणी पाऊसपूर्व तयारीसाठी स्थानिक प्रशासनांना पुरेसा वेळ मिळालेला नाही. तळकोकणात हवामान विभागाने येलो लर्ट जारी केला आहे. तेथे ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहात आहेत. विजांच्या कडकडाटासह पावसाने झोडपल्याने अनेक भागांमध्ये वीजपुरवठा खंडित झाला आहे. जळगाव जिल्ह्यात वीज कोसळल्याने एका कुटुंबाच्या चार म्हशी ठार झाल्याने नुकसान झाले आहे. अशा घटना टाळण्याच्या दृष्टीनेही नागरिकांना मार्गदर्शन केले गेले पाहिजे. एकीकडे पावसाच्या लहरीपणामुळे नुकसान झाले असले तरी काही भागांत शेतकरी सुखावलाही आहे. सोलापूर जिल्ह्यात हंगामातील पहिल्या जोराच्या पावसामुळे ऊसउत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. इतर लहानसहान पिके करणाऱ्या शेतकऱ्यांनाही या पावसाने तारले आहे. येत्या दहा दिवसांत राज्यभरात पावसाचा प्रभाव दिसणार आहे.

# सकारात्मक दृष्टिकोन हेच जीवनाचे सौंदर्य

आजच्या धावपळीच्या जीवनात अनेकदा आपण स्वतःलाच विसरून जातो. कामाचा ताण, आर्थिक समस्या आणि सामाजिक दबाव यांमुळे आपल्याला जीवनातील सुंदरता दिसत नाही. खरं तर जीवन हे अतिशय सुंदर आहे, फक्त ते अनुभवण्याची आणि जगण्याची कला आपल्याला शिकावी लागते.



सांसारिक जीवनात अनेक चढ-उतार येतात. पण यातून शिकून आपण आपल्या जीवनात सकारात्मकता आणि आशावाद जपत असतो. जीवनात यश मिळवण्यासाठी मेहनत आणि त्याग करणे आवश्यक आहेच, पण त्याचबरोबर जगण्याचा आनंद आणि अनुभव घेणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. आपण आपल्या चुकांमधून शिकून पुढे जाण्याची तयारी ठेवायला हवी.

आयुष्य कधी हसवते, तर कधी रडवते. परंतु आपण फक्त वाट्याला आलेले दुःख कुरवाळत बसतो आणि सोनेरी क्षण गमावून बसतो. आपल्या वाट्याला सतत सुख येत राहिले, तर त्याची किंमत राहणार नाही. जसं की ईसीजी मशीनवर आपली जीवनरेषासुद्धा चढ-उतार दर्शवत असते. ती सरळ झाली, तर आयुष्यच संपून जाईल. म्हणून त्या चढ-उतारांना जेवढे महत्त्व आहे, तेवढेच आपल्या आयुष्यातील चढ-उतारांनादेखील महत्त्व आहे.

आज सुंदर जीवन मिळावे यासाठी सर्वांचाच संघर्ष आहे. पहिली गोष्ट म्हणजे स्वतःला जाणून घ्यावे. हे वरकरणी सोपे वाटते. आपण स्वतःला समजून घेतच या जगातील सगळे व्यवहार करत असतो, नाही का? वाटते तितके ते सोपे नाहीच. जीवनाच्या शेवटीपर्यंतही अनेकांना स्वतःचा सूर गवसत नाही. जीवनात स्वतःला नक्की काय हवं होतं, हेही कळत नाही. प्रत्यक्षात, स्वतःला जाणून घेणे आव्हानात्मक आहे. यासाठी वेळोवेळी गहन आत्मनिरीक्षण आवश्यक आहे, कारण आपल्यापैकी बहुतेकांनी स्वतःबद्दल आणि स्वतःच्या हेतूबद्दल नकाराचे अनेक स्वर निर्माण केले आहेत.

आज प्रत्येकाला स्वतःचे प्रामाणिक मूल्यांकन करण्याची गरज आहे. आपल्या आयुष्यात असणारी सर्व क्षेत्रे प्रामाणिकपणे तपासून, तुमची आवड-निवड, तुमच्या इच्छा, मनात असणारी भीती आणि दडपण, कशामुळे तुम्हाला असुरक्षितपणा आणि लाज वाटते? तुमच्या नात्यांमध्ये कशामुळे समस्या निर्माण होतात? का तुम्ही सदैव अस्वस्थ राहता? हे प्रश्न पडायला हवेत. स्वतःबद्दल अधिकाधिक जाणून घेणे ही एक केवळ वैचारिक नाही, तर अत्यंत भावनाप्रधान प्रक्रिया असू शकते.

जीवन सुंदर आहे, फक्त जगता आलं पाहिजे या वाक्यात जीवनाच्या सौंदर्याची महत्त्वपूर्ण कल्पना मांडली आहे. मात्र, हे सौंदर्य प्रत्येकाला अनुभवता येत नाही, कारण जीवन जगण्याच्या दृष्टीकोनावरच त्याचे सौंदर्य अवलंबून असते. असे मला वाटतं.

जीवन ही निसर्गाची एक अनमोल देणगी आहे. पण हे सौंदर्य अनुभवण्यासाठी योग्य दृष्टिकोन असावा लागतो. सुख आणि दुःख या जीवनाच्या दोन बाजू आहेत. जर आपण दुःखाच्या छायेत सतत राहिलो, तर जीवन नीरस वाटू शकते. म्हणूनच, आनंदी राहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन ठेवला तरच जीवनाचे खरे सौंदर्य उमजते.

समाजात काही लोक जीवनाच्या संघर्षांमुळे खचून जातात, तर काही जण त्यातूनही आनंद शोधतात. एखादा गरीब माणूसही समाधानाने जगतो, तर श्रीमंत असूनही काही लोक अस्वस्थ असतात. यातून हे स्पष्ट होते की आयुष्यात सुख पैसे, संपत्ती किंवा ऐहिक गोष्टींवर अवलंबून नसते, तर जीवन जगण्याच्या दृष्टिकोनावर असते.

बरेच लोक भूतकाळातील दुःख किंवा भविष्याची चिंता करत वर्तमानातील क्षणांचा आनंद घेत नाहीत. मात्र, वर्तमानात राहून, लहान-लहान गोष्टींमध्ये आनंद शोधला तर जीवन अधिक सुंदर वाटते. उदा. निसर्गाची मजा घेणे, कुटुंबासोबत वेळ घालवणे, आवडत्या गोष्टी करणे यामुळे जीवन अधिक आनंददायी होते.

मानःशास्त्र सांगते की मानसिक आरोग्य उत्तम असेल तर जीवन अधिक सुंदर वाटते. सतत नकारात्मक विचार करणाऱ्या व्यक्तींना जीवन निराशाजनक वाटते, तर सकारात्मक विचारसरणी असलेल्या व्यक्तींना साध्या गोष्टींमध्येही आनंद सापडतो. मेडिटेशन, मानसिक तणाव कमी करणाऱ्या कृती आणि सकारात्मक विचारसरणीमुळे जीवन अधिक सुंदर बनते. सुख-दुःख, संघर्ष, आशा-निराशा या सगळ्यांचा स्वीकार करून आनंदाने जगले तरच जीवनाचे खरे सौंदर्य कळते. म्हणूनच, फक्त श्वास घेणे म्हणजे जगणे नव्हे, तर प्रत्येक क्षणाचा आनंद घेणे म्हणजे खरे जगणे. जगण्याची कला ज्याला जमते, तोच खऱ्या अर्थाने सुखी असतो. संघर्षाशिवाय मिळणारे सुख क्षणिक असते, पण संघर्षातून मिळालेले सुख अधिक अर्थपूर्ण आणि टिकाऊ असते.

जीवन कठीण असते, पण योग्य दृष्टीकोन असेल तर संकटांतरूनही आनंद शोधता येतो.

अभिमान वाटावा असं एक तरी नातं हवं.... ज्याच्या खांद्यावर डोकं ठेवलं की अक्षरशः बांध फुटावा.... कुणाजवळ तरी हंबरडा फोडून रडता यावं... कुणाला तरी सगळं सुख-दुःख सांगता यावं.... आयुष्यात कोणीतरी हवं त्याचं सगळं ऐकून घ्यावं आणि ज्याला आपलं सगळं काही सांगावं... कोणीतरी हवं ज्याला आपलं असणं हवंहवंस वाटावं. ज्याला आपलं रुसणं नकोसं वाटावं. आपण आनंदातच राहावं. आपल्या आयुष्यात दुःख येऊच नये आणि आलेल्या दुःखाला सामोरे जाण्याचे धैर्य त्यांनी आपल्याला द्यावं. आपल्या असण्याचा ज्याच्यावर फरक पडावा. आपल्या नसण्याने ज्याला विरह वाटावा. अशी हक्काची जिवाभावाची माणसं आपलं दुःख समजू शकतात. आपल्याला समजू शकतात. या सगळ्या समजून घेण्यामुळेच आपण सुखी, समाधानी, आनंदी राहू शकतो.

कशासाठी जगतो आहोत आम्ही? आणि कुणासाठी जगतो आहोत आम्ही? या दोन प्रश्नांची उत्तरे अगदी मध्यरात्री जरी कोणी विचारली तरी ती सांगता यावीत.. या प्रश्नांची उत्तरे सापडली नाहीत; तर मात्र माणूस नाईलाजाने आत्महत्येकडे वळतो.

आज आम्ही एका घरात राहत आहोत पण संवाद विसरत चाललो आहोत. हे केवढे दुर्भाग्य आहे. कुटुंबातील माणसे आहेत; पण कोणत्या न कोणत्या कारणामुळे एकमेकापासून दुरावलेली आहेत. नातेवाईक भरपूर आहेत प्रत्येक जण आपापल्या तोऱ्यात, गर्वात, अहंकारात, मीपणात काठोकाठ बुडाला आहे. ढीगभर मित्र आहेत पण मन मोकळे करावे असा एकही नाही. अंतकरण मोकळे करावे. हृदयात साठलेल्या सगळ्या वेदना दाखवाव्यात. काळजाला टोचणाऱ्या गोष्टी सांगाव्यात. मनाच्या वेदनादायी जखमांवर फुंकर घालावी. खदखदून हसावे. रडून एकदाच मोकळे व्हावे. असा एकही कुटुंबातील सदस्य, एकही नातेवाईक आणि एकही मित्र नसणे. म्हणजे आपल्या जीवनाचं सर्वात मोठं अपयश आहे.

एका बाजूला या भीतीयुक्त वातावरणामध्ये प्रचंड आशावादाने मनुष्य आपले जीवन जगत आहे. दुसरीकडे उदास मानसिकतेने आणि आपल्या भावनेचा झालेला कोंडमारा यामुळे त्रस्त झालेली माणसे आपली जीवनयात्रा संपवत आहेत. एकीकडे मरणाच्या भितीने हजारो किलोमीटर प्रवास करून आपल्या गावाचा आणि आपल्या घराचा रस्ता धरणारी माणसे. प्रचंड यातना सहन करून आपला जीव वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. दुसरीकडे संपूर्ण भौतिक सुखाने युक्त असणाऱ्या संपन्न जीवनशैलीत स्वर्गीय सुख अनुभवणारे लोक मात्र मरणाला जवळ करत आहेत.

आर्थिक सुबत्ता, भौतिक संपन्नता, प्रसिद्धी, पद, प्रतिष्ठा या सगळ्यांपेक्षा आनंद, सुख, समाधान या वेगळ्या संकल्पना आहेत. हे दिवसेंदिवस विसरत चाललो आहोत. मागच्या काही वर्षांपासून माणूस निव्वळ भौतिक सुख-सुविधा आणि भरमसाठ धनदौलत, संपत्ती कमावण्याच्या मागे लागला आहे. स्पर्धेच्या आजच्या युगात आम्ही विसरत चाललोय पैसा हे साध्य नसून; साधन आहे. माणसे, माणसामाणसातील प्रेम, आपुलकी, माया, ममता, वात्सल्य, जीवाभावाचे नाते-गोते आणि माणुसकी हेच आयुष्यात सुख आणि आनंद निर्माण करू शकतात. शोकांतिका म्हणजे या सगळ्यांपासून माणूस भरकटत चालला आहे. माणसातील माणूसपण आजच्या घडीला जिवंत राहिलेले नाही.

निसर्गाची सर्वात सुंदर रचना म्हणजे माणूस. मानव म्हणजे त्याला भावभावना आल्याच. कोणी सुखी तर कोणी दुःखी. सुखाने माणूस हुरळून जातो तर दुःखाने खचून जातो. ही प्रक्रिया अव्यहतपणे निरंतर चालू आहे. पृथ्वीवर जसे खाच खळगे आहेत, तसे मानवी जीवन सुख दुःखाने भरलेले आहे.

पु ल देशपांडे म्हणतात आनंद हा इतर कुठे नसतो तो आपल्या मनात असतो त्यांनी आपल्या विनोदी आणि हृदयस्पर्शी लेखनातून जीवनाच्या सौंदर्याची जाणीव करून दिली आणि ही जाणीव खऱ्या अर्थाने तुम्हाला आम्हाला होणं गरजेचं आहे.


**-समीक्षा चव्हाण, तारळे**



## बदलते तंत्रज्ञान

# स्मार्टफोन निर्यातीत भारताची मोठी झेप

स्मार्टफोन निर्यातीच्या बाबतीत भारतानी मोठी कामगिरी केली आहे. आर्थिक वर्ष २०२५मध्ये भारतातून २४.१४ अब्ज डॉलर्स किमतीचे स्मार्टफोन्स निर्यात झाले. गेल्या वर्षीच्या १५.५७ अब्ज डॉलर्सच्या निर्यातीपेक्षा हे ५५ टक्के जास्त आहे. अलिकडेच जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीनुसार यापैकी बहुतांश स्मार्टफोन्स अमेरिका, नेदरलँड्स, इटली, जपान आणि झेक प्रजासत्ताकमध्ये पाठवण्यात आले.



२०२४-२५ या आर्थिक वर्षात भारताने एकट्या अमेरिकेला १०.६ अब्ज डॉलर्सचे स्मार्टफोन निर्यात केले. गेल्या वर्षी अमेरिकेत निर्यात झालेल्या ५.५७ अब्ज किमतीपेक्षा हे दुप्पट आहे. भारतातील स्मार्टफोन निर्यातीने पेट्रोलियम उत्पादने आणि हिऱ्यांच्या निर्यातीलाही मागे टाकले आहे. याचा अर्थ असा की भारत आता पेट्रोकेमिकल्स आणि हिऱ्यांपेक्षा जास्त स्मार्टफोन निर्यात करतो.

अमेरिकेव्यतिरिक्त, नेदरलँड्सने गेल्या आर्थिक वर्षात भारतातून २.२ अब्ज किमतीचे आयफोन आयात केले, तर १.२६ अब्ज डॉलर्स किमतीचे स्मार्टफोन इटलीला आणि १.१७ अब्ज डॉलर्स किमतीचे स्मार्टफोन चेक रिपब्लिकला पाठवण्यात आले. टोकियोला होणारी स्मार्टफोन निर्यात आर्थिक वर्ष २०२२-२३मध्ये फक्त १२० मिलियन डॉलर्स होती, जी आर्थिक वर्ष २५मध्ये ५२० मिलियन डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे.

पीएलआय योजनेसह सरकारी प्रयत्नांमुळे गेल्या दोन आर्थिक वर्षांत स्मार्टफोन निर्यातीत वाढ झाली आहे. देशात अनेक स्मार्टफोन युनिट्स उघडले आहेत. यामुळे, या क्षेत्रातील भारताची पुरवठा साखळी मजबूत होत असून, अधिक गुंतवणूक आकर्षित होत आहे. आयफोन बनवणाऱ्या ॲपलसारख्या मोठ्या कंपन्याही त्यांचा उत्पादन बेस चीनमधून भारतात हलवत आहेत. उत्पादन खर्चात ५-८ टक्क्यांनी वाढ झाली असली तरी स्मार्टफोन उत्पादन केंद्र म्हणून भारतावर यामुळे विश्वास वाढला आहे.

भारत एक मोठा देश म्हणून उदयास येत आहे. भारतीयांनी विविध क्षेत्रात प्रगती केली असून जागतिक पातळीवर आपला दबदबा दिसून येतो. स्मार्टफोन निर्यातीमध्येही भारताचा आता डंका असल्याचे चित्र आहे.

# लेखक, समीक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णी

कला क्षेत्रातील मौलिक समीक्षेबद्दलचा सन्मान म्हणून फ्रेंच सरकारतर्फे 'कला-साहित्य क्षेत्राचा शिलेदार' ही पदवी मिळवणारे ज्ञानेश्वर नाडकर्णी साहित्याचे आणि कलांचे जाणकार समीक्षक म्हणून मराठी साहित्यात प्रसिद्ध आहेत.



## निमित्त

ज्ञानेश्वर गणपत नाडकर्णी यांचा जन्म जोगेश्वरी, मुंबई येथे झाला. प्राथमिक शिक्षण सर नारायण चंदावरकर शाळा, माध्यमिक शिक्षण राम मनोहर व चिकित्सक समूह या शाळांतून झाले. एलफिन्स्टन आणि विल्सन महाविद्यालयात एम.ए.पर्यंतचे (इंग्रजी) शिक्षण. लेखनाची आवड शाळेपासून. १९४९पासून 'मौज' साप्ताहिक आणि 'सत्यकथा' यांतून स्फुटलेखन, 'तुकाराम शेंगदाणे' या टोपण नावाने.

१९५१ ते १९५३ या काळात भारतीय हाय कमिशनरच्या परराष्ट्र खात्यात नोकरीनिमित्त इंग्लंडमध्ये वास्तव्य. काही वर्षे शिल्पी या जाहिरात संस्थेत आणि फ्री प्रेस जर्नल, फिनान्शिअल एक्सप्रेस यांमध्ये सहसंपादक म्हणून काम पाहिले.

ज्ञानेश्वर नाडकर्णींचे नाव मराठी साहित्यात प्रामुख्याने घेतले जाते, ते त्यांच्या चोखंदळ आणि मार्मिक अशा साहित्य आणि नाट्य, चित्रपट आणि चित्रकला या क्षेत्रांतल्या समीक्षेसाठी. 'मराठी नाटक आणि रंगभूमी' (१९६३), 'भारतीय चित्रपट सृष्टीतले नवे प्रवाह' (१९७४), 'पिकासो' (१९८६), 'हिचकॉक' (१९९०), 'अश्वत्थाची सळसळ' (१९८८), 'प्रतिभेच्या पाऊलवाटा' (२००३) अशा पुस्तकांतून त्यांनी भारतीय आणि पाश्चात्त्य साहित्य, रंगभूमी, चित्रपट आणि चित्रकला ह्या क्षेत्रांतल्या नामवंतांचा आणि त्यांच्या कलांचा समर्पक परिचय देऊन त्यांच्या कलेची सखोल समीक्षा करून समीक्षा क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. त्याचबरोबर "Balgandharva and the Marathi Theater' आणि "Gaitonde' ही दोन समीक्षात्मक पुस्तके इंग्लिशमध्ये लिहिली आहेत.

'दोन बहिणी' (१९५६), 'कोंडी' (१९५८), 'चरित्र' (१९८९), 'नजरबंद' (१९९१), 'वलयांकित' (१९९६) या त्यांच्या कादंबर्या आणि 'चिद्घोष' (१९६६), 'प्रस्थान' (१९८८) हे काही कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

परदेश वास्तव्यातील वेगळे आणि समृद्ध अनुभव, तिथल्या कलाक्षेत्रातली सूक्ष्म निरीक्षणे, पारशी, ख्रिस्ती अशा वेगळ्या समाजांतील उच्चभ्रू वर्गाच्या बहुरंगी जीवनाची जवळून ओळख, त्या जगातल्या अनुभवांवर आधारित कथा व कादंबरी लेखन हे वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे, वाचकांचे कुतूहल वाढवणारे आहे. ललित लेखन करण्याची क्षमता असूनही नाडकर्णींचा ओढा समीक्षेकडे अधिक असल्याचे जाणवते.

फ्रेंच सरकारच्या पदवी व्यतिरिक्त नाडकर्णींना संगीत नाटक अकादमीची शिष्यवृत्ती, मराठी नाट्यपरिषदेचे वि.स.खांडेकर पारितोषिक, 'चिद्घोष'-(कथा) ललित पारितोषिक, 'प्रस्थान'-(कथा) केशवराव कोठावळे पारितोषिक, ललितकला अकादमी आणि फिल्म सेन्सार बोर्डाचे सदस्यत्व; असे बरेच सन्मान आणि पुरस्कार लाभले आहेत. ज्ञानेश्वर नाडकर्णी हा कलासमीक्षेच्या क्षेत्रातला परवलीचा शब्द ठरला आहे.

**-मंदाकिनी भारद्वाज**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# तुमच्या दिवसाची सुरुवात 'या' गोष्टींनी करा...

तुम्हालाही झोपेतून उठताना थकवा आणि आळस जाणवतो? आता तुमच्या कॉफीच्या सेवनाचे परीक्षण करण्याची आणि त्याशिवाय सकाळची सुरुवात करण्याचे मार्ग अवलंबण्याची वेळ आली आहे. आपल्यापैकी बरेच जण कॉफीवर अवलंबून असतात, परंतु कॅफिनच्या अवलंबित्वामुळे शरीरातील ऊर्जा कमी होऊ शकते, झोपेत व्यत्यय येऊ शकतो आणि पचनाच्या समस्यादेखील उद्भवू शकतात, असे क्लिनिकल आहारतज्ज्ञ गरिमा गोयल म्हणाल्या. त्यांनी सकाळी एक कप कॉफी न पिताही ऊर्जावान वाटण्याचे अनेक नैसर्गिक मार्ग आहेत यावर भर दिला.



सकाळच्या थकव्याचे सर्वात दुर्लक्षित कारण म्हणजे डिहायड्रेशन. सहा-आठ तासांच्या झोपेनंतर तुमचे शरीर नैसर्गिकरित्या डिहायड्रेट होते, ज्यामुळे तुम्हाला आळस जाणवतो. पचन आणि चयापचय गतिमान करण्यासाठी एक ग्लास कोमट पाण्यात लिंबू पिळून प्या. इलेक्ट्रोलाइट संतुलन सुधारण्यासाठी पाण्यात चिमूटभर गुलाबी मीठ घाला. सकाळी उठल्यावर सर्वात आधी चहा किंवा कॉफीऐवजी पाणी प्या. योग्यरित्या हायड्रेट केल्याने तुमचे चयापचय सुरू होते, विषारी पदार्थ बाहेर पडतात आणि रक्ताभिसरण सुधारते, ज्यामुळे तुम्हाला अधिक जागृत आणि सतर्क वाटते.

शारीरिक हालचाल तुमच्या शरीराला जागे होण्याचा संकेत देते आणि मेंदूमध्ये रक्ताभिसरण आणि ऑक्सिजनचा प्रवाह वाढवून तुम्हाला ऊर्जा देते. झोपेतून उठल्यावर लगेच ५-१० व्यायाम करा. डाउनवर्ड डॉग किंवा कॅट काउ यांसारख्या काही योगासनांमुळे रक्तप्रवाह सुधारतो. एंडोर्फिन वाढवण्यासाठी १०-१५ मिनिटे सकाळी जलद चालणे किंवा हलका कार्डिओ करा. जर तुम्हाला कमी तीव्रतेचे व्यायाम आवडत असतील तर सौम्य व्यायाम किंवा खोल श्वास घेण्याचे व्यायामदेखील मदत करू शकतात. अगदी थोडीशी हालचालदेखील तुम्हाला किती जागृत आणि ताजेतवाने वाटते यावर लक्षणीय परिणाम करू शकते.

सकाळी किमान १०-१५ मिनिटे बाहेर पडा. जर तुमच्या घरात सूर्यप्रकाश कमी येत असेल तर लाईट थेरपी लॅम्प वापरण्याचा विचार करा. सकाळचा सूर्यप्रकाश झोपेच्या आणि जागे होण्याच्या चक्रांचे नियमन करण्यास मदत करतो आणि व्हिटॅमिन-डीचे उत्पादन वाढवतो, जे उर्जेच्या पातळीसाठी महत्त्वपूर्ण आहे.

RNI No. MAHBIL/2009/35529

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ११, अंक १३] गुरुवार ते बुधवार, मार्च २७-एप्रिल २, २०२५/चैत्र ६-१२, शके १९४७ [पृष्ठे १७ किंमत रुपये : १४.००

**प्राधिकृत प्रकाशन**

**शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी**

**उप विभागीय अधिकारी, पनवेल यांजकडून**

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उविअ/भूसं/कात-५/आडीवली-धानसर/१८७३/२०२५.—— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण १२/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक २९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ड) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्हयाच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीनमध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत.) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती कारणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा.).

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्स उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे) नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावती करणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचेदेखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल, (जुना ठाणानाका) यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

**गाव आडीवली, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| अनुक्रमांक | स.नं./हि.नं. | संपादीत क्षेत्र (चौ.मी.मध्ये) |
|---|---|---|
| १ | ३३/३ | ०.१५६० |
| २ | ३३/५अ | ०.१३१० |
| ३ | ३३/५ब | ०.०७९० |
| ४ | ३३/५क | ०.००१० |
| | **एकूण** | **०.३६७० चौ.मी.** |

**गाव धानसर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| अनुक्रमांक | स.नं./हि.नं. | संपादीत क्षेत्र (चौ.मी.मध्ये) |
|---|---|---|
| १ | १ | ०.००१० |
| २ | ३ | ०.१३०० |
| ३ | ४ | ०.१८२० |
| ४ | ५ | ०.०४०० |
| ५ | १२४अ | ०.०५८० |
| ६ | १२४ब | ०.०३२० |
| ७ | १२५ | ०.१००० |
| ८ | १२६ | ०.०८६० |
| ९ | ११८ | ०.१९५० |
| १० | १२८ | ०.०६४० |
| ११ | १२९ | ०.१७०० |
| १२ | १३१ | ०.२७०० |
| १३ | १३२ | ०.३१०० |
| १४ | १३३ | ०.१६२० |
| १५ | गावठाण | ०.०९५० |
| १६ | १३३/७ | ०.३८९६ |
| | **एकूण** | **२.२८४६ चौ.मी.** |

**गाव धरणाकॅम्प, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| अनुक्रमांक | स.नं./हि.नं. | संपादीत क्षेत्र (चौ.मी.मध्ये) |
|---|---|---|
| १ | १२/१ | ०.२८५६ |
| २ | १२/२ | ०.००२४ |
| ३ | १२/८ | ०.०४९० |
| ४ | १२/९अ | ०.०२२२ |
| ५ | १२/१० | ०.०८८८ |
| ६ | १२अ | ०.०८७१ |
| ७ | १६ | ०.३७७७ |
| ८ | १७/१ | ०.०८०० |
| ९ | १७/२ | ०.०१७२ |
| १० | १७/३ | ०.००६० |
| ११ | २० | ०.१०८९ |
| १२ | ३४/३ | ०.१८०० |
| १३ | ८ | ०.०१८० |
| १४ | ११ | ०.०७८० |
| १५ | १२/२ | ०.२३७० |
| १६ | १४अ | ०.०५३० |
| १७ | १४ब | ०.०३३० |
| १८ | १४क | ०.३७९० |
| १९ | १८ | ०.३७२० |
| | **एकूण** | **२.४७४९ चौ.मी.** |

**गाव पिसार्वे, तालुका पनवेल जिल्हा रायगड**

| अनुक्रमांक | स.नं./हि.नं. | संपादीत क्षेत्र (चौ.मी.मध्ये) |
|---|---|---|
| १ | १३७/१ | ०.०१२३ |
| २ | १३७/२ | ०.१३४९ |
| ३ | १३७/३अ | ०.१२३४ |
| ४ | १३७/६ | ०.०८८० |
| ५ | १३७/७ | ०.०७०० |
| | **एकूण** | **०.४२८६ चौ.मी.** |

**गाव रोहिंजण, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| अनुक्रमांक | स.नं./हि.नं. | संपादीत क्षेत्र (चौ.मी.मध्ये) |
|---|---|---|
| १ | ४२/० | ०.००७० |
| २ | ४१/० | ०.२७२० |
| ३ | ४२/अ | ०.००२५ |
| ४ | ३५/४ | ०.१३५० |
| ५ | ३५/३ | ०.०६६० |
| ६ | ३५/२ | ०.०७२० |
| ७ | ३५/६ | ०.१६८० |
| ८ | ३५/१ | ०.०२४० |
| ९ | ३५/५ | ०.०६८० |
| १० | २६/० | ०.५७९० |
| ११ | २७/१ | ०.११०० |
| | **एकूण** | **१.५०३५ चौ.मी.** |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**अधिसूचना :- प्रकल्पाचे नाव** :- पनवेल महानगर पालिका हद्दीतील मौजे-आडीवली, धरणाकॅम्प, धानसर एकूण क्षेत्र १७४७.७४ चौ.मी. रोहींजण व पिसार्वे एकूण क्षेत्र ३२४७०.५५ चौ.मी. येथील राष्ट्रीय महामार्ग (NH-४) लगतच्या सर्व्हे नं.३३ पासून ते मौजे-धरणाकॅम्प, येथील सर्व्हे नं.१० पर्यंत या २४.०० मी. रस्त्याने बाधित भूखंडाचे भूसंपादन करणेकामी प्रयोजन.

**निर्गमित :- प्रकल्प कार्याचे वर्णन** :- पनवेल महानगर पालिका हद्दीतील मौजे-आडीवली, धरणाकॅम्प, धानसर एकूण क्षेत्र १७४७.७४ चौ.मी. रोहींजण व पिसार्वे एकूण क्षेत्र ३२४७०.५५ चौ.मी. येथील राष्ट्रीय महामार्ग (NH-४) लगतच्या सर्व्हे नं.३३ पासून ते मौजे-धरणाकॅम्प, येथील सर्व्हे नं.१० पर्यंत या २४.०० मी. रस्त्याने बाधित स.नं.३३/३ व इतर, संयुक्त विवरणपत्रात नमूद केलेल्या मिळकतीप्रमाणे एकूण क्षेत्र ०.३६७० चौ.मी., २.२८४६ चौ.मी., २.४७४९ चौ.मी., ०.४२८६ चौ.मी.व १.५०३५ चौ.मी. भूखंडाचे भूसंपादन करणेसाठी आवश्यक आहे.

**करण्यापूर्वी :- समाजाला मिळणारे लाभ** :- पनवेल शहराचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यात आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे सार्वजनिक रहदारीसाठी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे.

**अनुसूची-तीन**

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** :- निरंक

**अनुसूची-चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश** :- पनवेल महानगर पालिका हद्दीतील मौजे-आडीवली, धरणाकॅम्प, धानसर एकूण क्षेत्र १७४७.७४ चौ.मी. रोहींजण व पिसार्वे एकूण क्षेत्र ३२४७०.५५ चौ. मी. येथील राष्ट्रीय महामार्ग (NH-४) लगतच्या सर्व्हे नं.३३ पासून ते मौजे-धरणाकॅम्प, येथील सर्व्हे नं. १० पर्यंत या २४.०० मी. रस्त्याने बाधित स. नं.३३/३ व इतर संयुक्त विवरणपत्रात नमूद केलेल्या मिळकतीप्रमाणे एकूण क्षेत्र ०.३६७० चौ.मी., २.२८४६ चौ.मी., २.४७४९ चौ.मी., ०.४२८६ चौ.मी. व १.५०३५ चौ.मी. भूखंडाचे भूसंपादन करणेसाठी आवश्यक आहे. या जमिनी संपादन करण्यामुळे केवळ ५५ खातेदार बाधीत होत आहेत व खातेदार विस्थापित होत नाही. पनवेल शहराचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यात आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे सार्वजनिक रहदारीसाठी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे सार्वजनिक हितासाठी भूसंपादन अधिनियम, २०१३ कलम ९ व ४० मधील तरतुदींनुसार सामाजिक परिणाम निर्धारणाच्या अभ्यासाची आवश्यकता नाही.
सदर भूसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करावी.

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील** :- निरंक

**टीप** :- उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, उप विभाग पनवेल यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

ठिकाण: पनवेल,
दिनांक ४ मार्च २०२५.

**पवन चांडक,**
उपविभागीय अधिकारी,
पनवेल उप विभाग, पनवेल.

(पान ६ वर..)

(पान ५ वरून)

**BY THE SUB DIVISIONAL OFFICER, PANVEL**

*NOTIFICATION*

RIGHT TO FAIR COMPENSATION IN LAND ACQUISITION, REHABILITATION AND RESETTLEMENT ACT, 2013.

No. उविअ/भूसं/कात-५/आडीवली-धानसर/१८७३/२०२५.— In pursuance of the Government Notification issued by the Government of Maharashtra in exercise of the powers conferred by the proviso to Clause (*e*) of Section 3 of the Land Acquisition, Rehabilitation and Right to Fair Compensation and Transparency Act, 2013 (30 of 2013). Revenue and Forests Department C Narrow 12/2014/Q No. 77/A-2, dated 29th January, 2015 (hereinafter referred to as " the said notification ") notified that, in relation to the acquisition of land for a public purpose made in clause (*d*) of section 3 of the said Act, for a jurisdiction of 500 hectares in a District, the Collector of such District shall be deemed to be the appropriate authority for the purpose of the said Act ;

AND WHEREAS, the land described in more detail in Schedule One annexed hereto (hereinafter referred to as "the said land") for a public purpose (hereinafter referred to as "the said public purpose") to the Collector of Raigad District having the appropriate authority under the said notification is) required or is likely to be required, the nature of which is set out in Schedule Two attached hereto, and it is hereby notified by sub-section (*1*) of section 11 of the said Act that the said land is likely to be required for the said public purpose ;

AND WHEREAS, the reasons compelling the displacement of the affected person in pursuance of the proposed land acquisition are set out in Schedule-III attached hereto. (In case of displacement, the reasons should be mentioned in this schedule.) ;

AND WHEREAS, the social impact assessment summary is set out in Schedule IV attached hereto ;

And whereas, the details of the Administrator appointed for the purpose rehabilitation and resettlement under sub-section (*1*) of section 43 are set out in Schedule-V attached hereto. (If appointment is required, details should be mentioned in this schedule.) ;

THEREFORE, it is hereby declared that in accordance with sub-section 4 of section 19 of the said Act, no person shall, from the date of publication of this notification till the completion of the proceedings under Chapter IV of the said Act, make any transaction in the said land or any part thereof or in the said land Will not create any load:

Provided that, on application by the owner of the said land or part thereof, the District Collector may, by stating in writing the reasons for the special circumstances, exempt such owner from the operation of the aforesaid provision:

Provided further that if any person willfully contravenes this provision no compensation shall be made by the District Collector for any loss suffered by him.

Also, as per sub-section (*5*) of section 11 of the said Act, the Collector Right to Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014 (hereinafter referred to as "the said Rules") It is also declared to undertake and complete the work of updating the land records as prescribed by sub-rule (3) ;

And WHEREAS, the District Collector under Clause (*c*) of Section 3 of the said Act is deputing the Sub-Divisional Officer Panvel, Sub-Division Panvel, (Old Thana Naka) to perform the functions of the Collector under the said Act.

*Schedule-I*

Description of the Land

Village Adivali, Tal. Panvel, Dist. Raigad

| Sr.No. | Survey No. | Area in Sq.m |
|---|---|---|
| 1 | 33/3 | 0.1560 |
| 2 | 33/5A | 0.1310 |
| 3 | 33/5B | 0.0790 |
| 4 | 33/5C | 0.0010 |
| | **Total** | **0.3670** |

Village Dhansar, Tal. Panvel, Dist. Raigad

| Sr.No. | Survey No. | Area in Sq.m |
|---|---|---|
| 1 | 1 | 0.0010 |
| 2 | 3 | 0.1300 |
| 3 | 4 | 0.1820 |
| 4 | 5 | 0.0400 |
| 5 | 124A | 0.0580 |
| 6 | 124B | 0.0320 |
| 7 | 125 | 0.1000 |
| 8 | 126 | 0.0860 |
| 9 | 118 | 0.1950 |
| 10 | 128 | 0.0640 |
| 11 | 129 | 0.1700 |
| 12 | 131 | 0.2700 |
| 13 | 132 | 0.3100 |
| 14 | 133 | 0.1620 |
| 15 | Gavthan | 0.0950 |
| 16 | 133/7 | 0.3896 |
| | **Total** | **2.2846** |

Village Dharnacamp, Tal. Panvel, Dist. Raigad

| Sr.No. | Survey No. | Area in Sq.m |
|---|---|---|
| 1 | 12/1 | 0.2856 |
| 2 | 12/2 | 0.0024 |
| 3 | 12/8 | 0.0490 |
| 4 | 12/9A | 0.0222 |
| 5 | 12/10 | 0.0888 |
| 6 | 12A | 0.0871 |
| 7 | 16 | 0.3777 |
| 8 | 17/1 | 0.0800 |
| 9 | 17/2 | 0.0172 |
| 10 | 17/3 | 0.0060 |
| 11 | 20 | 0.1089 |
| 12 | 34/3 | 0.1800 |
| 13 | 8 | 0.0180 |
| 14 | 11 | 0.0780 |
| 15 | 12/2 | 0.2370 |
| 16 | 14A | 0.0530 |
| 17 | 14B | 0.0330 |
| 18 | 14C | 0.3790 |
| 19 | 18 | 0.3720 |
| | **Total** | **2.4749** |

Village Pisarve, Tal. Panvel, Dist. Raigad

| Sr.No. | Survey No. | Area in Sq.M |
|---|---|---|
| 1 | 137/1 | 0.0123 |
| 2 | 137/2 | 0.1349 |
| 3 | 137/3A | 0.1234 |
| 4 | 137/6 | 0.0880 |
| 5 | 137/7 | 0.0700 |
| | **Total** | **0.4286** |

Village Rohinjan, Tal.Panvel, Dist. Raigad

| Sr.No. | Survey No. | Area in Sq.m |
|---|---|---|
| 1 | 42/0 | 0.0070 |
| 2 | 41/0 | 0.2720 |
| 3 | 42/A | 0.0025 |
| 4 | 35/4 | 0.1350 |
| 5 | 35/3 | 0.0660 |
| 6 | 35/2 | 0.0720 |
| 7 | 35/6 | 0.1680 |
| 8 | 35/1 | 0.0240 |
| 9 | 35/5 | 0.0680 |
| 10 | 26/0 | 0.5790 |
| 11 | 27/1 | 0.1100 |
| | **Total** | **1.5035** |

*Schedule-ll*

**Statement on the nature of public purpose**

**Notification: Name of the project :** Panvel Municipal Corporation Mauje-Adivili, Dharana-camp, Dhansar in Panvel Taluka, District Raigad Area 1747.74 sq.m.& Rohinjan and Pisarve in Panvel Taluka, District Raigad Total Area 32470.55 sq.m. From Survey No.33 adjacent to the National Highway (NH-4) hereto Survey No.10 at Mauje-Dharnacamp, this 24.00 m. Purpose of land acquisition of the plot affected by the wide road.

**Description of Exit Project :** Panvel Municipal Corporation Mauje-Adivili, Dharana-camp, Dhansar in Panvel Taluka, District Raigad Area 1747.74 sq.m. & Rohinjan and Pisarve in Panvel Taluka, District Raigad Total Area 32470.55 sq.m. From Survey No.33 adjacent to National Highway (NH-4) to Survey No.10 at Mauje-Dharanacamp, this 24.00 m. S. No. 33/3 affected by wide road and other mentioned in joint measurement Total area as per mentioned income is 0.3670 sq.m., 2.2846 sq.m. m., 2.4749 sq.m., 0.4286 sq.m. and 1.5035 sq.m. Necessary for land acquisition of the plot.

(पान ७ वर..)

# मोफत नेत्रतपासणी शिबीर संपन्न



**पेण : प्रतिनिधी**

श्री भवानी जगदंबा देवी देवस्थान ट्रस्ट वाशी आणि लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या मोफत नेत्रतपासणी शिबिरास वाशी ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पेण तालुक्यातील वाशी येथील श्री भवानी जगदंबा देवी देवस्थान वाशी ट्रस्ट तर्फे ग्रामस्थांसाठी मोफत नेत्रचिकित्सा शिबीर घेण्यात आले. यामध्ये मोफत नेत्रतपासणी सोबत मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी नोंदणी व अल्पदरात चष्मे उपलब्ध करून देण्यात आले.

मंदिर देवस्थान ट्रस्टतर्फे प्रथमच आयोजित केलेल्या नेत्रतपासणी शिबिरास पंचक्रोशीतील ग्रामस्थांचा मिळालेला प्रतिसाद पाहून अजून विविध आरोग्य शिबीरे तसेच सामाजिक उपक्रम राबविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे मंदिर देवस्थान ट्रस्टतर्फे सांगण्यात आले.

या शिबिरासाठी श्री भवानी जगदंबा देवी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष नरेश म्हात्रे, उपाध्यक्ष सुधाकर म्हात्रे, सचिव गणेश थवई, खजिनदार भाई म्हात्रे, गोपीनाथ पाटील, हमरापूर ग्रा.पंचायत माजी सरपंच प्रदीप म्हात्रे, लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टचे डॉक्टर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुष्मी येथे समाज प्रबोधनात्मक उपक्रम

पेण प्रतिनिधी

पेण तालुक्यातील दुष्मी येथील नवतरुण बौद्ध मित्र मंडळ दुष्मी यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विविध महामानवांचे प्रतीकात्मक पेहेराव करून शोभायात्रा, ओबीसी समाजासाठी बाबासाहेबांचे योगदान या विषयावर व्याख्यान तर ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या वतीने हर घर संविधान या पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले होते. या कार्यक्रमास पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल, मा.जि.प. सदस्य डी.बी. पाटील, मंडळाचे अध्यक्ष दीपक कांबळे, ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, उद्योजक राजू पिचिका, दयानंद भगत, भारतीय बौद्ध महासभेचे चंद्रकांत सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

भीमजयंती उत्सव संपन्न होण्यासाठी राष्ट्र सेवा दल रायगड, ग्राम संवर्धन सामाजिक संस्था रायगड, शिवछावा प्रतिष्ठान दुष्मी, जयंती महोत्सव समिती अध्यक्ष दीपक कांबळे, उपाध्यक्ष मंगेश कांबळे, सचिव सचिन कांबळे, खजिनदार संदेश कांबळे, सुनील कांबळे, रमेश कांबळे, प्रकाश कांबळे, विश्वास कांबळे, यशवंत कांबळे, अनिल कांबळे, भीमराव कांबळे, तुळशीदास कांबळे, निलेश कांबळे, मिलिंद कांबळे, संदीप जनार्दन कांबळे, संदीप म. कांबळे, अभिजीत कांबळे, महेश कांबळे, करण कांबळे, प्रणय गायकवाड, प्रणित गायकवाड, अनुराग कांबळे, शुभम कांबळे, संस्कार कांबळे, विनोद शिंदे, प्रतिभा मोहिते यांच्यासह सर्व महिला कार्यकारिणी सदस्यांनी मेहनत घेतली शेवटी उपाध्यक्ष मंगेश कांबळे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.



# कुलदैवत उत्सवाची ज्ञानेश्वरी ठाकूर यांच्या कीर्तनाने सांगता

**पेण :** पेण तालुक्यातील मोठे भाल येथे आयोजित कुलदैवत उत्सव मंगळवार १३ मे २०२५ रोजी झाला . सकाळी ८: ०० वाजता बालयोगी ओम शक्ती महाराज शक्तीपीठ (पालघर) यांच्या हस्ते होमहवन झाले सकाळी १० : ०० वाजता हभप ज्ञानेश्वरी ठाकूर (दिव) यांचे वारकरी कीर्तन झाले. कीर्तनास मृदंग साथ गोविंद महाराज (सरेभाग) व सोहम ठाकूर यांची होती. सायंकाळी गायक वृंद कावेरी ठाकूर, शर्मिला ठाकूर, (दिव), ऋतिकाताई (सरेभाग) यांची कीर्तनास गायन साथ होती. कीर्तनास पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित लावली होती.



# प्रतिपालित विद्यार्थ्यांची विविध संस्थांना भेट

**पेण : प्रतिनिधी**

चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया हि संस्था मुलांच्या उच्च शिक्षणासाठी तसेच त्यांच्या उज्वल भविष्यासाठी सतत कार्यरत असते व त्यांच्यासाठी अनेक उपक्रमही राबवत असते. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून दहावी आणि बारावीच्या प्रतिपालित विद्यार्थ्यांसाठी सीएफआय संस्थेद्वारे एक्सपोजर व्हिजीट सीएफआय संस्थेचे संचालक डॉ. किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.

यामध्ये आयटीआय पनवेल व पेण, एल अँड टी कंपनी, प्रहार पोलिस अकॅडमी,पेण, अश्व पॅरामेडिकल इन्स्टिटयूट, पेण, टेलरिंग आणि फॅशन डिझाईनिंग कोर्स,पेण, फाईन आर्ट कोर्स, डिप्लोमा इंजिनिअरिंग कोर्स, विट नर्सिंग इन्स्टिटयूट, पनवेल आणि विजय आर्मी स्कूल, चिखले'या ठिकाणी भेटी देण्यात आल्या. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना विविध कोर्सेसच्या संबंधित सर्वसमावेशक माहिती मिळाली,

ज्यामध्ये कोर्सची कालावधी,फी संरचना, ट्रेड निहाय आणि श्रेणी निहाय कट ऑफ,आवश्यक कागदपत्रे, मासिक अनुदानाच्या तरतुदी, नोकरीच्या संधी, उपलब्ध सुविधांचा आणि भविष्यातील संधींचा समावेश होता. या कार्यशाळांच्या भेटीने मुलांना विविध ट्रेड्स आणि प्रशिक्षणांची स्पष्ट आणि व्यावहारिक समज दिली. यामुळे पुढील अभ्यासक्रम निवडणे सोपे जाणार आहे.

## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव बेलंतारा फेज-२ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. कराडे खुर्द, रसायनी, ता. पनवेल, जि.रायगड., असे असून सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. २२/०५/२०२५ ते २८/०५/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दि. २९/०५/२०२५, नामनिर्देशन पत्र माघारी दि.३१/०५/२०२५ ते १४/०६/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक २२/०६/२०२५ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती बेलंतारा फेज-२ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. कराडे खुर्द, रसायनी, ता. पनवेल, जि. रायगड या संस्थेचे कार्यालयांत पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(सुरेखा पाटील)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

## जाहिर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील मिळकतीचे मालक **श्री संतोष गणपत मंडलिक रा. गौळवाडी, ता. कर्जत, जि.रायगड. ४१०२०१** यांचेकडून खालील वर्णन केलेली मिळकत कायम खरेदीखताने घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे

**मौजे- गौळवाडी, ता. कर्जत, जिल्हा रायगड.**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र (हे.आर.प्रती) | आकार |
|---|---|---|---|
| २५ | ३ | क्षेत्र ०.०८.०० | ०.०६ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत इतर दुसरे कोणाचा साठेकारार, खरेदीखत, विकसनकरार, ताबाकब्जा, वहिवाट, गहाण, दान, लिज, वैगरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ दिवसाचे** आत खालील सही करणार वकील यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचाही हरकत न आल्यास सदर मिळकत हि निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशील व्यवहार पुंर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

**दिनांक १९/५/२०२५**

**सही/-**
**ॲड. किशोर अनंता दिघे**
**मु.खाडयाचा पाडा पो.पाषाणे,**
**ता. कर्जत, जि.रायगड. ८००७९७०१५१**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, **मे. अर्थ होम तर्फे भागीदार श्री. विवेकानंद वसंतराव पाटील, सौ. मनिषा विवेकानंद पाटील, श्री. प्रकाश बाबुराव पाटील** यांनी खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीच्या विकसनाचे हक्क नोंदणीकृत दस्तांव्दारे मुळ जमीन मालकांकडून हस्तांतरीत करुन घेतलेले असून आमचे अशिल सदर जमीन मिळकत में अर्थ होम यांच्याकडून विकसनास घेण्याच्या विचारात आहेत

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे वाशिवली, तालुका- खालापूर, जिल्हा-रायगड,**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र आर.चौ.मी. से.मी. | आकार रु. पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ५/३ | १३८-६०-०० पैकी १३२-१०-०० | १३२.१० | अनंत पिलाजी उर्फ नथु शिंदे<br>यमुना बळीराम जाधव<br>रेश्मा रमेश बडेकर<br>रमेश रामचंद्र भोईर<br>गणेश यशवंत पवार<br>मंदा अशोक दळवी<br>कुंदा सोपान दाभाडे<br>सुगंधा रमेश पवार<br>कै. चंद्रकांत पिलाजी उर्फ नथु शिंदे चे वारस<br>सुनंदा चंद्रकांत शिंदे<br>ज्ञानेशकुमार चंद्रकांत शिंदे<br>राजेश चंद्रकांत शिंदे<br>जयेश चंद्रकांत शिंदे<br>मोहिनी पंढरीनाथ शेडगे<br>निलम राजेंद्र ढेणे |
| ३३ (जुना ६७/०) | ५३-१०-०० | ५३१.०० | |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. २०/०५/२०२५.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय : २. आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ अनिल डोरॉक्सच्या बाजूला, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६.**
**मो क्र: ९९३०३६९८६१**

## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

### जाहिर सुचना
### विद्युत विभाग

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने विद्युत विभागातील खालील कामांचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता संबंधीत Manufacturer कडून वेगवेगळ्या बाबींचे दर मागविण्यात येत आहे.

कामाचे नाव-पनवेल महानगरपालिका क्षेत्रामधील खारघर रेल्वे स्टेशनला लागून असलेला स्कॉयवॉक वर पारेषण संलग्न ६३० KWp (On Grid) क्षमतेचा सौर ऊर्जा संच स्थापित करून कार्यान्वित करणे.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/**
**प्र.क्र.२०७/२१०/२०२५**
**दिनांक :- २०/०५/२०२५**

**सही/-**
**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा/ वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता.पनवेल, जि. रायगड | | | | | | | | |
| १ | तळोजा ४७२ | पेंधर १७२+६१ | २३५/३B | ०-१५-५ | ८८८.५ पूर्णांकात ९०० चौ.मी. पैकी ६५० चौ. मी. | भूखंड क्र. ७, सेक्टर -१७, क्षेत्र ६५० चौ.मी. | **श्री. वसंत महादू पाटील** | |
| | | पेंधर १७२(१) | १३८/७ १३८/१७ २४३/१ | ०-१७-० | | | | |
| | | पेंधर १७२ | २४२/१B | ०-२६-७ | | | | |
| | | पेंधर १७३ | १३६/३ | ०-७५-६ ०-४२-० प्रस्तावित | | | | |
| | | | एकूण क्षेत्र | १-०१-२ | | | | |
| २ | खारघर ३८४ | ओवे १६४ | ४४१/५ | ०-१८-४ पैकी ½ हिस्सानुसार ०-९-२ | ८०.५० चौ.मी. पूर्णांकात १०० चौ.मी. | भूखंड क्र. ४६F, सेक्टर -३४A, क्षेत्र १४० चौ.मी. | **१)कै. शामा रामा भोईर (मयत) यांचे वारस**<br>१.१) श्रीमती चंद्राबाई शामा भोईर<br>१.२) श्री. ज्ञानेश्वर शामा भोईर<br>१.३) श्री. अंकुश शामा भोईर<br>१.४) श्री. विजय शामा भोईर<br>१.५) श्रीमती संगीता त्रिंबक नेरुलकर<br>१.६) श्रीमती करुणा शामा भोईर<br>१.७) श्रीमती उज्वला शामा भोईर<br>१.८) श्री. महेश शामा भोईर | |
| | | ओवे ५५६ | ४४१/३ | ०-०८-२ | ७१.७५ चौ.मी. ४० चौ.मी. | | | |
| | | | एकूण क्षेत्र | ०-२६-६ | १४० चौ.मी. | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र करुन देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
साडेबारा टक्के भूमी विभाग,
सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

सिडको/जनसंपर्क/०८४/२०२५-२६

(पान ६ वरुन)

1747.74 sq.m. & Rohinjan and Pisarve in Panvel Taluka, District Raigad Total Area 32470.55 sq.m. From Survey No.33 adjacent to National Highway (NH-4) to Survey No.10 at Mauje-Dharanacamp, this 24.00 m. S. No. 33/3 affected by wide road and other mentioned in joint measurement Total area as per mentioned income is 0.3670 sq.m., 2.2846 sq.m. m., 2.4749 sq.m., 0.4286 sq.m. and 1.5035 sq.m. Necessary for land acquisition of the plot.

***Before* :- Benefits to society :** As the industrial importance and urbanization as well as development and expansion of Panvel city is fast, the society will not be able to uplift without acquiring the proposed area. So widening of the road is necessary for public purpose.

*Schedule-III*

**Compelling the displacement of the affected person** :- Nil

*Schedule-IV*

***Summary of Social Impact Assessment :*** Panvel Municipal Corporation Mauje-Adivili, Dharanacamp, Dhansar in Panvel Taluka, District Raigad Area 1747.74 sq.m. & Rohinjan and Pisarve in Panvel Taluka, District Raigad Total Area 32470.55 sq.m. From Survey No.33 adjacent to National Highway (NH-4) to Survey No.10 at Mauje-Dharanacamp, this 24.00 m Width road affected by S.No.33/3 and other income as mentioned in joint statement total area 0.3670 sq.m., 2.2846 sq.m. m., 2.4749 sq.m., 0.4286 sq.m. and 1.5035 sq.m. Necessary for land acquisition of the plot. Due to acquisition of these lands, only 55 account holders are affected and account holders are not displaced. Industrial importance and urbanization and development of Panvel city And since the expansion is going on fast, the society will not be able to improve without acquiring the proposed area. So widening of the road is necessary for public purpose. Therefore, there is no need for social impact assessment study as per the provisions of Section 9 and 40 of Land Acquisition Act 2013 in Public Interest.

The said land acquisition process should be started at the earliest.

The amendment to chapter III under Close 10 A of the LAAR (Maharashtra and Amendment) Act, 2018.

Place: Panvel,
Date 4th March 2025.

PAWAN CHANDAK,
Sub Divisional Officer,
Panvel, Sub Division, Panvel.

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/६१/७६१/२०२५

# हैदराबादचा लखनौवर विजय

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या १८ व्या मोसमातील ६१ व्या सामन्यात सनरायजर्स हैदराबादने लखनौ सुपर जायंट्सवर ६ विकेट्सने विजय मिळवला आहे. लखनौने हैदराबादला विजयासाठी २०६ धावांचं आव्हान दिलं होतं. हैदराबादने हे आव्हान १० बॉलआधी आणि ४ विकेट्सच्या मोबदल्यात पूर्ण केलं. हैदराबादने १८.२ ओव्हरमध्ये विजयी आव्हान पूर्ण केलं.

हैदराबादचा हा या मोसमातील १२ व्या सामन्यातील चौथा विजय ठरला. तसेच हैदराबादने विजय मिळवत लखनौला या स्पर्धेतून बाहेर केलं. लखनौ या स्पर्धेतून बाहेर पडणारी पाचवी टीम ठरली. त्यामुळे आता प्लेऑफमधील उर्वरित एका जागेसाठी मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिट्ल्स यांच्यात थेट लढत पाहायला मिळणार आहे.



ओपनर अभिषेक शर्मा याने हैदराबादच्या विजयात सर्वाधिक धावांचं योगदान दिलं. अभिषेकने २० बॉलमध्ये ६ सिक्स आणि ४ फोरसह ५९ रन्स केल्या. अर्थव तायडे याने १३ रन्स केल्या. विकेटकीपर ईशान किशनने २८ चेंडूत २ षटकार आणि ३ चौकारांच्या मदतीने ३५ धावांचं योगदान दिलं. हेनरिक क्लासेन याने २८ बॉलमध्ये ४७ रन्स केल्या. कामिंदु मेंडीस ३२ रन्स करुन रिटायर्ड हर्ट झाला. तर अनिकेत वर्मा आणि नितीश कुमार रेड्डी या दोघांनी प्रत्येकी नाबाद ५-५ धावा करत हैदराबादला विजयापर्यंत पोहचवलं.

**मुंबई-दिल्ली सामन्याकडे लक्ष**

दरम्यान आता २१ मे रोजी मुंबई विरुद्ध दिल्ली यांच्यात होणाऱ्या सामन्याकडे क्रिकेट चाहत्यांचं लक्ष असणार आहे. दोन्ही संघांचा हा या मोसमातील १३ वा सामना असणार आहे.

मुंबईच्या खात्यात १४ आणि दिल्लीच्या खात्यात १३ पॉइंट्स आहेत. त्यामुळे मुंबईने हा सामना जिंकला तर ते प्लेऑफसाठी क्वालिफाय करतील, मात्र दिल्लीला मुंबई आणि त्यानंतर २४ मे रोजी पंजाब विरुद्ध अशा दोन्ही सामन्यांमध्ये जिंकावं लागेल. त्यामुळे आता एका जागेसाठी २ संघात जोरदार चुरस पाहायला मिळणार आहे.

# केएल राहुलने टाकले विराट कोहलीला मागे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेटमधील स्टायलिश क्रिकेटर केएल राहुल याने टी-२० क्रिकेट कारकिर्दीत एक मैलाचा पल्ला पार केला आहे. गुजरात टायटन्सविरुद्धच्या आयपीएल सामन्यात त्याने दिल्ली कॅपिटल्सकडून आयपीएलमध्ये पाचवे शतक झळकावले. या खेळीसह त्याने टी-२० क्रिकेटमध्ये आठ धावांचा पल्ला गाठलाय. सर्वात जलगतीने हा टप्पा पार करत त्याने विराट कोहलीला मागे टाकले आहे.



याआधी भारताकडून टी-२० क्रिकेमध्ये सर्वात जलद आठ हजार धावा करण्याचा विक्रम हा कोहलीच्या नावे होता.

# इंग्लंड दौऱ्यासाठी सर्फराझ खानची विशेष तयारी

## तब्बल १० किलो वजन केले कमी

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघ जून महिन्यात इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे, जिथे टीम इंडिया पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळेल. भारताच्या अ संघात निवड झालेल्या एका भारतीय खेळाडूने इंग्लंड दौऱ्यासाठी जोरदार तयारी करीत आहे. या खेळाडूने आपल्या तब्बल १० किलो वजन कमी केले असून सराव दुप्पट केला आहे.

रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या अचानक कसोटी निवृत्तीनंतर भारतीय संघ निवडणे हे निवडकर्त्यांसाठी मोठे आव्हान असणार आहे. त्याआधी भारत अ संघाला इंग्लंड लायन्सविरुद्ध दोन अनौपचारिक चार दिवसीय सामने खेळायचे आहेत. बीसीसीआयने नुकतीच या मालिकेसाठी संघ जाहीर केला आहे.



टीम इंडियाचा युवा फलंदाज सर्फराझ खान इंग्लंड दौऱ्यासाठी कठोर मेहनत घेत आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा निवृत्त झाल्यानंतर सर्फराझला वरिष्ठ संघात स्थान मिळण्याची अधिक शक्यता आहे. विराटच्या जागी तो कसोटी संघात प्लेईंग इलेव्हनचा भाग बनू शकतो.

सर्फराझने आतापर्यंत टीम इंडियासाठी ६ कसोटी सामने खेळले आहेत, त्याने हे सर्व सामने फक्त भारतीय भूमीवर खेळले आहेत. ज्यामध्ये त्याने ३७.१० च्या सरासरीने ३७१ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने एक शतक आणि ३ अर्धशतकंही झळकावली आहेत. तो टीम इंडियाकडून शेवटचा सामना न्यूझीलंडविरुद्ध मुंबईत खेळला होता.

# 'महाराष्ट्राच्या क्रिडा पत्रकारांच्या बातमीदारीचे कौतुक केले पाहिजे'



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या क्रिडा पत्रकारांच्या बातमीदारीचे कौतुक खूप कौतुक केलं पाहिजे. महाराष्ट्रातील वृत्तपत्रात माझी हेडलाईन येणे म्हणजे खूप मोठी गोष्टी होती. असे उद्गार मुंबई मराठी पत्रकार संघाच्या क्रीडा पुरस्कार वितरण सोहळ्यावेळी मुख्य अतिथी भारताचे माजी हॉकी कर्णधार पद्मश्री धनराज पिल्ले काढले.

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या क्रिडा पत्रकार पुरस्कार सोहळ्यावेळी ते बोलत होते. माझ्या विजयाची एक पत्रकार परिषद स्वर्गीय हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी मातोश्री बंगल्यावर घेतली होती. यावेळी दुसऱ्या दिवशी सर्व वृत्तपत्रात जे आलेली हेडलाईन धनराज पिल्ले यांना ४८ तासात मुंबईत घर होती ती खूप मला भावली. अशा अनेक आठवणी त्यांनी सांगितल्या.

सोहळ्याचे अतिथी ग्रँडमास्टर बुद्धिबळपटू प्रवीण ठिपसे म्हणाले, आम्ही खेळ खेळत होतो मात्र बातमीतून लिखाणातून हे पत्रकार आमच्या मनातले लिहित होते ही खूप मोठी गोष्ट आहे.खेळाडू घडविण्यासाठी मराठी प्रिंट पत्रकारांनी मोठी कामगिरी केली आहे.

महाराष्ट्राचे पहिले मिस्टर इंडिया कबड्डीपटू विजू पेणकर व पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनीही मनोगत व्यक्त केले. संघाचे कार्यवाह व पुरस्कार समितीचे उपाध्यक्ष शैलेंद्र शिर्के यांनी प्रास्ताविक केले, पुरस्कार समिती उपाध्यक्ष व संघाच्या उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर यांनी मनोगत व्यक्त केले.

या वेळी विश्वस्त देवदास मटाले, सुरेश वडवलकर, प्रा.हेमंत सामंत, दिवाकर शेजवळ, आदी पदाधिकारी उपस्थित होते. सोहळ्याचे निवेदन अश्विन बापट यांनी तर आभार प्रदर्शन राजेंद्र हुंजे यांनी केले.

कै.आत्माराम मोरे युवा क्रीडा पत्रकार पुरस्कार ७ हजार रुपये धनादेश शाल ट्रॉफी असा हा पुरस्कार २०२० सालचा मंगेश वरवडेकर यांना, २०२१ चा पुरस्कार तुषार वैती,२०२२ चा पुरस्कार प्रसाद लाड, २०२३ चा पुरस्कार जयेंद्र लोंढे,२०२४ चा पुरस्कार रोहित नाईक यांना दिला.



**पनवेल : कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कुल, कळंबोलीची विद्यार्थिनी कनिष्का गणेश गायकर हि दहावी बोर्डाच्या परीक्षेत ९८.४ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली. याबद्दल तिचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी ओबीसी जिल्हा अध्यक्ष राजेश गायकर, कनिष्काचे वडील गणेश गायकर उपस्थित होते.**

# रोहितकडून मौल्यवान लॅम्बोर्गिनी विजेत्याला भेट; व्हिडीओ व्हायरल

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२५च्या जाहिरातीपैकी रोहित शर्माच्या जाहिरातीने सर्वांचे लक्ष वेधले होते, ज्यामध्ये धडाकेबाज फलंदाज रोहित शर्माने आपली कार भेट म्हणून देणार असल्याचे म्हटले होते. आता रोहितने ही कार विजेत्या स्पर्धकाला भेट म्हणून दिली आहे, ज्याचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.



मुंबई इंडियन्सच्या रोहित शर्माने सोमवारी फॅन्टसी क्रिकेट स्पर्धे तील विजेत्यांपैकी एकाला त्याची मौल्यवान लॅम्बोर्गिनी उरुस ही कार दिली. मुंबईच्या रस्त्यांवर अनेकदा आयकॉनिक निळ्या लॅम्बोर्गिनीमध्ये फिरताना दिसणारा रोहित त्याची हीच कार एका भाग्यवान विजेत्याला देताना दिसला. रोहितच्या या कारचा नंबरही तितकाच ऐतिहासिक आहे.

रोहितची '२६४' क्रमांक असलेली लॅम्बोर्गिनी ही कार दीर्घकाळापासून त्याच्याकडे आहे. एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याच्या २६४ धावांच्या विश्वविक्रमी खेळीचा आकडा त्याने या कारला नंबर म्हणून दिला आहे. मार्केटमध्ये या लॅम्बोर्गिनीची किंमत सुमारे चार कोटी रुपये आहे. ही लक्झरी एसयूव्ही गेल्या काही वर्षांत चाहत्यांच्या पसंतीची बनली आहे. भारतीय कर्णधार रोहित शर्माकडेदेखील हीच कार आहे.

आयपीएल २०२५च्या सुरुवातीला रोहितने ड्रीम११ च्या जाहिरातीत विनोदी पद्धतीने कार देण्याचे आश्वासन दिले होते. रोहितची ही जाहिरात व्हायरल झाली होती. दोन भागांच्या या जाहिरातीत रोहित प्रथम भावनिकपणे ही गाडी देण्याची घोषणा करताना दिसला आणि नंतर त्याच्या कारमधून एका चाहता त्याची कार घेऊन जाताना दिसत होता, ज्यामुळे भारतीय कर्णधाराला रिक्षातून घरी जावे लागले होते.

सुरुवातीला चाहत्यांना प्रश्न पडला होता विजेत्याला रोहितची ही कार मिळणार की नवी कार मिळणार आहे, पण आता रोहितने त्याची कार देताना पाहून चाहते चकित झाले आहेत. रोहित या कारची चावी देतानाचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.




**पनवेल, उरण : जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे भारतीय नागरिकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानातील दहशतवादी अड्ड्यांना उध्वस्त करून समाचार घेतला. त्या अनुषंगाने 'ऑपरेशन सिंदूर' या लष्करी मोहिमेतील भारतीय सशस्त्र दलाच्या अतुलनीय शौर्याचा गौरव करण्यासाठी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वाचा सन्मान करण्याच्या उद्देशाने पनवेल, खारघर, कळंबोली, उरणमध्ये भव्य 'तिरंगा यात्रा' काढण्यात आली. या यात्रेमध्ये महिलावर्गाचा लक्षणीय सहभाग होता.**













दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com